रायगड, नवी मुंबई

# रामप्रहर

◆ वर्ष १८ ◆ अंक १९३
www.ramprahar.com

◆ शुक्रवार, ३० जानेवारी २०२६ ◆ पाने ८ ◆ किंमत ₹ २

## अंतरंग

सात लाखांचे हेरॉईन जप्त; आरोपीला अटक/६
आजपासून जिल्ह्यात 'स्पर्श' कुष्ठरोग जनजागृती अभियान/७
नरसिंह यादव दंगल लीगचे चॅम्पियनपद महाराष्ट्राकडे/८

## जि.प., पं.स. निवडणुकीसाठी आता ७ फेब्रुवारीला मतदान



**मुंबई :** उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या निधनामुळे राज्यात तीन दिवसांचा दुखवटा जाहीर करण्यात आला असल्यामुळे १२ जिल्हा परिषदा व त्याअंतर्गतच्या १२५ पंचायत समित्यांच्या सार्वत्रिक निवडणुकांच्या उर्वरित टप्प्यांमध्ये बदल करण्यात आला असून ५ फेब्रुवारी २०२६ ऐवजी आता ७ फेब्रुवारी २०२६ रोजी मतदान; तर ९ फेब्रुवारी २०२६ रोजी मतमोजणी होईल. संबंधित जिल्हाधिकारी सुधारित निवडणूक कार्यक्रमाची सूचना ३१ जानेवारी २०२६ रोजी प्रसिद्ध करतील. आता ७ फेब्रुवारी रोजी सकाळी ७.३० ते सायंकाळी ५.३० या वेळेत मतदान होईल. प्रचाराची समाप्ती ५ फेब्रुवारी २०२६ रोजी रात्री १० वाजता होईल. ९ फेब्रुवारी २०२६ रोजी सकाळी १० वाजता मतमोजणी सुरू होईल. निवडून आलेल्या सदस्यांची नावे शासन राजपत्रात ११ फेब्रुवारी २०२६ पर्यंत प्रसिद्ध केली जातील.

# पनवेल महानगरपालिकेतील महायुतीची अधिकृत गट नोंदणी





**पनवेल : रामप्रहर वृत्त**

पनवेल महानगरपालिकेतील भारतीय जनता पक्ष, शिवसेना व राष्ट्रवादी काँग्रेस यांच्या महायुतीची अधिकृत गट नोंदणी गुरुवारी (दि.२९) कोकण विभागीय आयुक्त कार्यालयात झाली. या वेळी गटनेते नितीन पाटील यांच्यासोबत महायुतीचे नगरसेवक, नगरसेविका उपस्थित होते.

माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर, आमदार प्रशांत ठाकूर, आमदार महेश बालदी, जिल्हाध्यक्ष अविनाश कोळी, माजी नगराध्यक्ष जे.एम. म्हात्रे यांच्या नेतृत्वाखाली पनवेल महानगरपालिकेच्या २०२६ सार्वत्रिक निवडणुकीत भाजप-शिवसेना-राष्ट्रवादी काँग्रेस यांच्या महायुतीने दणदणीत विजय मिळवत स्पष्ट बहुमत प्राप्त केले आहे. महायुतीचे एकूण ५९ नगरसेवक विजयी झाले असून यामध्ये भाजपचे ५५, शिवसेनेचे दोन व राष्ट्रवादी काँग्रेसचे दोन नगरसेवकांचा समावेश आहे. **(पान २ वर..)**

# लाडक्या अजितदादांना अखेरचा निरोप

## बारामतीमध्ये शासकीय इतमामात अंत्यसंस्कार



**बारामती : प्रतिनिधी**

'एकच वादा, अजितदादा,' 'अमर रहे, अमर रहे, अजितदादा अमर रहे,' 'परत या, परत या, अजितदादा परत या' दादा, दादा असा हंबरडा फोडत हजारोंच्या साश्रू नयनांनी राज्याचे उपमुख्यमंत्री अजितदादा पवार यांना अखेरचा निरोप दिला. गुरुवारी (दि.२९) दुपारी बाराच्या सुमारास विद्या प्रतिष्ठानच्या मैदानात अजितदादांच्या पार्थिवावर शासकीय इतमामात अंत्यसंस्कार करण्यात आले.

अजित पवारांचे पुत्र जय पवार आणि पार्थ पवार या दोघांनीही वडिलांच्या पार्थिवाला मुखाग्नी दिला. अजित पवारांचे अंत्यदर्शन घेण्यासाठी केंद्रीय गृहमंत्री अमित शाह, केंद्रीयमंत्री नितीन गडकरी, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, भाजपचे नवे राष्ट्रीय अध्यक्ष नितिन नबीन यांच्यासहीत राज्यातील अनेक नेते उपस्थित होते.

बारामतीमधील विद्या प्रतिष्ठानचे मैदान समर्थकांनी खचखाच भरले होते. रात्रीपासूनच अजित पवारांचे अंत्यदर्शन घेण्यासाठी समर्थकांनी मोठी गर्दी केली होती. सकाळी अजित पवारांचे पार्थिव त्यांचे मूळ गाव असलेल्या काटेवाडीमधील 'पवार फार्म' या निवासस्थानी नेण्यात आले होते.

अजित पवारांचे अंत्यदर्शन घेण्यासाठी अनेक आजी-माजी मंत्री बारामतीत हजर होते. सुशीलकुमार शिंदे, प्रणिती शिंदे, खासदार शाहू महाराज, विश्वजीत कदम, अशोक चव्हाण, शशिकांत शिंदे, मंत्री शिवेंद्रसिंहराजे, जयंत पाटील, हर्षवर्धन पाटील, मंगलप्रभात लोढा, प्रफुल्ल पटेल आणि सुनील तटकरे, मंत्री चंद्रकांत पाटील, छगन भुजबळ, राज ठाकरे, शर्मिला ठाकरे, अमित ठाकरे आदी उपस्थित होते.

# चौलमध्ये वृद्धेचा गळा आवळून खून

## सोन्याच्या दागिन्यांची चोरी

**रेवदंडा : प्रतिनिधी**

चौल ग्रामपंचायत हद्दीतील टेकाळकर आळी येथील घर क्रमांक ५१७ मध्ये एकटी राहत असलेल्या मंदा प्रमोद म्हात्रे (वय ७०) या वृद्ध महिलेचा जबरी चोरीदरम्यान खून झाल्याची धक्कादायक घटना उघडकीस आली आहे. अज्ञात चोरट्यांनी घरात घुसून सोन्याचे दागिने हिसकावण्याचा प्रयत्न करताना झालेल्या झटापटीत त्यांचा मृत्यू झाल्याचे प्राथमिक तपासात निष्पन्न झाले असून या घटनेने संपूर्ण परिसरात खळबळ उडाली आहे.

ही घटना रेवदंडा पोलीस ठाण्याच्या हद्दीत घडली असून माहिती मिळताच रेवदंडा पोलीस, श्वान पथक तसेच फॉरेन्सिक पथक घटनास्थळी दाखल झाले. पुढील तपास पोलीस उपनिरीक्षक भैरू किसन जाधव यांच्या मार्गदर्शनाखाली सुरू असून उपविभागीय पोलीस अधिकारी माया मोरे यांनीही घटनास्थळी भेट देऊन पाहणी केली.

मयत मंदा म्हात्रे या गेल्या सुमारे दहा वर्षांपासून माहेरच्या मालमत्तेची देखरेख करण्यासाठी टेकाळकर आळी येथील घरात एकट्याच राहत होत्या. त्यांचे पती प्रमोद शांताराम म्हात्रे हे गुंजीस, पो. नवगाव, ता. अलिबाग, जि. रायगड येथे वास्तव्यास आहेत. २८ जानेवारी रोजी सकाळी साडेनऊ वाजेपर्यंत पती-पत्नींचा फोनवर संपर्क झाला होता, मात्र सकाळी साडेदहा वाजल्यानंतर मंदा म्हात्रे यांचा फोन उचलला जात नसल्याने संशय बळावला. दिवसभर संपर्क न झाल्याने रात्री ८ वाजता फिर्यादी प्रमोद म्हात्रे घरी आले असता **(पान २ वर..)**

# पनवेल, खारघरमधून एकाच दिवशी सहा मुले बेपत्ता

**पनवेल : वार्ताहर**

पनवेल व उपनगरांमध्ये १४ ते १७ वयोगटातील मुले बेपत्ता होण्याच्या घटनांमध्ये चिंताजनक वाढ होत आहे. एकाच दिवशी खारघर आणि पनवेल शहर परिसरातून तब्बल सहा मुले बेपत्ता झाल्याच्या तक्रारी दाखल झाल्या. या प्रकरणांना कायद्यानुसार अपहरणाचा दर्जा देत पोलिसांनी गुन्हे नोंदवले आहेत. वाढत्या घटनांमुळे पालकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले असून परिसरात खळबळ उडाली आहे.

खारघर सेक्टर १२ येथील पालकांनी दिलेल्या तक्रारीनुसार दहावीत शिकणारा त्यांचा मुलगा 'मी घर सोडून जात आहे,' असे सांगून घराबाहेर पडला, तो परतलाच नाही. दुसऱ्या घटनेत कोपरा गावातील सेक्टर १० परिसरातील महिलेने चार अल्पवयीन मुलांच्या बेपत्ताबाबत तक्रार दाखल केली आहे. या मुलांचे वय १४ ते १७ वर्षांदरम्यान असून त्यामध्ये दोन मुलींचा समावेश आहे. यातील दोन मुले भावंडे आहेत. पनवेल तालुक्यातील नेरे गावातूनही १७ वर्षांच्या मुलगा बेपत्ता आहे.

# विमान अपघाताची चौकशी सुरू



**मुंबई : प्रतिनिधी**

राज्याचे उपमुख्यमंत्री अजित पवारांच्या विमान अपघाताची चौकशी आता केंद्रीय संस्थेकडून होणार आहे. विमान अपघात तपास ब्युरो या संस्थेने अपघाताची चौकशी सुरू केली असून त्याचा अहवाल आल्यानतंर तो राज्य सरकारलाही पाठवण्यात येणार आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीसांनी या अपघाताची चौकशी करावी असे पत्र केंद्रीय उड्डाण मंत्री किंजरापु राममोहन नायडू यांना लिहिलं होतं. त्यानंतर केंद्रीय मंत्र्यांनी मुख्यमंत्र्यांना लिहिलेल्या पत्रात ही माहिती दिली.

यामध्ये म्हटले आहे की, विमान अपघात तपास ब्युरो यांनी तपास सुरू केला आहे. विमानातील ब्लॅकबॉक्स ताब्यात घेण्यात आला आहे. विमान अपघात आणि घटना नियमांनुसार, तपास सुरू केला आहे. तो पारदर्शी आणि कालबद्ध पद्धतीने होईल. या अपघातातील सर्व टेक्निकल रेकॉर्डस, ऑपरेशनल तपशील, घटनास्थळावरील तथ्य याचा तपास केला जात आहे. भविष्यात अशा घटना होऊ नयेत, या आपल्या विनंतीची मंत्रालयाने दखल घेतली असून, चौकशी अहवाल येताच त्यादृष्टीने उपाययोजना करण्यात येतील. स्थानिक प्रशासनाची यात मदत लागेल. हा संपूर्ण चौकशी अहवाल राज्य सरकारलाही आम्ही देऊ.

## निवडक

### चंदीगड महानगरपालिका निवडणूकीत भाजपचा विजय



**चंदीगड :** येथे नुकतेच महानगरपालिका निवडणूक पार पडली. या महानगरपालिका निवडणुकीत भाजपने विजय प्राप्त केला आहे. आता वरिष्ठ उपमहापौर आणि उपमहापौर पदासाठी निवडणूक पार पडणे बाकी आहे. समोर आलेल्या माहितीनुसार, सौरभ जोशी हे महापौर म्हणून नाव जाहीर झाले आहे.

### खेड-मंडणगड मार्गावर ७० जिवंत गावठी बॉम्ब जप्त

**रत्नागिरी :** जिल्ह्यामध्ये स्थानिक गुन्हे अन्वेषण शाखेचे पथक खेड उपविभागामध्ये पेट्रोलिंग करीत असताना खेड-मंडणगड रस्त्यावर मुगीज येथे सायंकाळी सुमारे ५:२५ वा. संशयास्पद हालचाली करणाऱ्या प्रकाश राम जगताप (वय ३३, रा. शिरखल, दापोली) याला ताब्यात घेण्यात आले. त्याच्या ताब्यातून बेकायदेशीररीत्या स्फोटक पदार्थ सदृश ७० जिवंत गावठी बॉम्ब तसेच एक चारचाकी वाहन असा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.

# भाजप महायुतीला नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद

## नेरे, आदई परिसरात प्रचाराला वेग



**पनवेल : रामप्रहर वृत्त**

रायगड जिल्हा परिषद व पनवेल पंचायत समितीची सार्वत्रिक निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर नेरे जिल्हा परिषद गट तसेच नेरे आणि आदई पंचायत समिती गणांमध्ये भाजप महायुतीच्या उमेदवारांना नागरिकांचा उदंड व उत्स्फूर्त प्रतिसाद मिळत आहे. सर्वसामान्य नागरिकांमध्ये मोठ्या प्रमाणात उत्साहाचे वातावरण पाहायला मिळत असून, विकासाच्या मुद्द्यावर आधारित ही निवडणूक होणार असल्याचा ठाम विश्वास मतदारांकडून व्यक्त होत आहे.

नेरे जिल्हा परिषद गटातून सामाजिक प्रश्नांची जाण असलेले आत्माराम बाळू भस्मा, नेरे पंचायत समिती गणातून वर्षा सचिन केवारे, तर आदई पंचायत समिती गणातून भूपेंद्र सदानंद पाटील हे कार्यक्षम, विकासाभिमुख व लोकाभिमुख लोकप्रतिनिधी म्हणून सर्वपरिचित आहेत. त्यांच्या कार्यकाळात करण्यात आलेली विविध विकासकामे ही त्यांची जमेची बाजू ठरत असून, तिन्ही उमेदवारांनी लोकांच्या दैनंदिन प्रश्नांसाठी सातत्याने पाठपुरावा केला आहे.

या उमेदवारांचा दांडगा जनसंपर्क असून, नागरिकांच्या सुख-दुःखात प्रत्यक्ष सहभागी होणारे नेतृत्व म्हणून त्यांची ओळख आहे. गेल्या काही दिवसांपासून सुरू असलेल्या जनसंपर्क मोहिमा, घरभेटी, बैठका व प्रचाराला नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित राहत आहेत. विकासाभिमुख कामगिरीवर विश्वास व्यक्त करत ग्रामस्थ भाजप महायुतीच्या उमेदवारांना जाहीर पाठिंबा देत आहेत.

याउलट विरोधी उमेदवारांनी जनतेच्या प्रश्नांकडे व विकासाच्या मुद्द्यांकडे दुर्लक्ष केल्याने त्यांच्याबाबत नाराजीचा सूर उमटताना दिसत आहे. विरोधकांचा दृष्टिकोन स्वतःपुरताच मर्यादित राहिल्याची भावना मतदारांमध्ये निर्माण झाली आहे. नेरे व आदई परिसरातील ग्रामस्थांनी स्थिर नेतृत्व, पारदर्शक कारभार आणि सर्वांगीण विकास या त्रिसूत्रीवर भाजप महायुतीच्या उमेदवारांना पसंती दिल्याचे स्पष्ट चित्र सध्या दिसून येत आहे.

महिलावर्ग, युवक तसेच ज्येष्ठ नागरिकांमध्येही भाजप महायुतीच्या उमेदवारांविषयी सकारात्मक वातावरण असून, सर्व स्तरांतून त्यांना उत्स्फूर्त पाठिंबा मिळत आहे. त्यामुळे लोकांची जाण असलेले, काम करण्याची सकारात्मक मानसिकता बाळगणारे भाजप महायुतीचे उमेदवार या निवडणुकीत घवघवीत यश संपादन करतील, असा ठाम विश्वास कार्यकर्त्यांसह ग्रामस्थ नागरिकांकडून व्यक्त होत आहे. शेकापक्षात राहून विकासकामे होणार नाहीत याची जाणिव कार्यकर्त्यांना झाल्यामुळे या विभागातील शेकाप कार्यकर्त्यांनी नुकताच भाजपमध्ये प्रवेशही केला आहे. त्यामुळे भाजप महायुतीच्या उमेदवारांची आणखी ताकद वाढली आहे.

# प्रत्येक व्यक्तीपर्यंत सुविधा पोहचवण्यावर भर -पंतप्रधान मोदी

**नवी दिल्ली : वृत्तसंस्था**

संसदेच्या अर्थसंकल्पीय अधिवेशनाच्या दुसऱ्या दिवशी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी माध्यमांना संबोधित केले. या वेळी त्यांच्या सरकारने देशातील प्रत्येक व्यक्तीपर्यंत पोहचण्याचा प्रयत्न केल्याचे सांगितले. कोणतीही योजना असो, ती समाजातील शेवटच्या घटकापर्यंत पोहोचवण्यात आल्याचेही त्यांनी यावेळी नमूद केले.



पंतप्रधान मोदी म्हणाले की ही गोष्ट आम्हाला पसंत न करणारेही मान्य करतात की या सरकारने शेवटच्या व्यक्तीपर्यंत सुविधा पोहचवण्यावर भर दिला आहे. आम्ही ही परंपरा पुढेही सुरू ठेवणार आहोत. भारताची डेमोक्रेसी आणि डेमोग्राफी जगासाठी एक मोठा आशेचा किरण आहे. मोदी म्हणाले की, लोकांच्या अपेक्षा पूर्ण करण्याच्या आपल्या ध्येय घेऊन ते पुढे चालत राहतील.

पंतप्रधान मोदी यांनी यावेळी राष्ट्रपती द्रोपदी मूर्मू यांच्या अभिभाषणावर देखील भाष्य केले. पंतप्रधान मोदी म्हणाले की, राष्ट्रपतींचे भाषण हे १४० कोटी देशवासीयांच्या आत्मविश्वासाची अभिव्यक्ती होते. त्यांचे भाषण सर्व खासदारांसाठी मार्गदर्शनात्मक होते. अधिवेशनाच्या सुरुवातीलाच त्यांनी खासदारांकडून ज्या अपेक्षा व्यक्त केल्या आहेत, मला पूर्ण विश्वास आहे की त्यांना सर्वांनी गंभीर्याने घेतले असेल, असेही पंतप्रधान मोदी म्हणाले.

# प्रजासत्ताक दिन संचलनात महाराष्ट्राचा चित्ररथ देशात सर्वोत्कृष्ट




**नवी दिल्ली : वृत्तसंस्था**

देशाच्या ७७व्या प्रजासत्ताक दिनानिमित्त दिल्लीतील कर्तव्यपथावर पार पडलेल्या दिमाखदार सोहळ्यात महाराष्ट्राच्या सांस्कृतिक वैभवाचे सादरीकरण सर्वोत्कृष्ट ठरले आहे. यंदाच्या संचलनामध्ये राज्यांच्या चित्ररथांमध्ये महाराष्ट्राच्या चित्ररथाने प्रथम क्रमांक पटकावला आहे. केंद्र सरकारकडून या निकालांची अधिकृत घोषणा करण्यात आली असून, या गटात जम्मू-काश्मीर आणि केरळ या राज्यांनी अनुक्रमे द्वितीय आणि तृतीय क्रमांक पटकावला आहे.

यंदा महाराष्ट्राने 'गणेशोत्सव: आत्मनिर्भरतेचे प्रतीक' या संकल्पनेवर आधारित चित्ररथ सादर केला होता. या चित्ररथाच्या माध्यमातून महाराष्ट्राची समृद्ध लोकसंस्कृती, गणेशोत्सवाचा सामाजिक वारसा आणि त्यातून मिळणारा आर्थिक रोजगार व आत्मनिर्भरतेचा संदेश अत्यंत प्रभावीपणे मांडण्यात आला होता. चित्ररथावरील भव्य गणेशमूर्ती, पारंपरिक ढोल-ताशा पथक आणि लेझीम खेळणाऱ्या कलाकारांच्या उत्साहाने कर्तव्यपथ दुमदुमून गेला होता. याच प्रभावी सादरीकरणामुळे परीक्षकांनी राज्य आणि केंद्रशासित प्रदेशांच्या गटातून महाराष्ट्राच्या चित्ररथाला सर्वोत्तम चित्ररथ म्हणून निवडले आहे. केवळ राज्यांच्या श्रेणीतच नव्हे, तर इतर विभागांतही चुरस पाहायला मिळाली. केंद्रीय मंत्रालयांच्या गटामध्ये सांस्कृतिक मंत्रालयाच्या चित्ररथाने बाजी मारली.

# कोस्टल रोडवर लवकरच हेलिपॅड

**मुंबई :** वरळीत मुंबईच्या कोस्टल रोडवर लवकरच हेलिपॅडची सुविधा उभारण्यात येणार आहे. हेलिकॉप्टर लँडिंगसाठी राजभवन, महालक्ष्मी रेसकोर्स आणि आता कोस्टल रोड हा एक नवीन पर्याय उपलब्ध होणार आहे.

वरळी येथे उभारण्यात आलेल्या मुंबईतील पहिल्या सार्वजनिक हेलिपॅडचे संचालन आणि देखभालसाठी महापालिकेने कंत्राटदार नेमण्याची प्रक्रिया सुरु केली आहे. त्यासाठी २ फेब्रुवारीपर्यंत निविदा सादर केली जाणार आहे. वरळीमध्ये समुद्रात १०० मीटर अंतरावर असलेल्या जेट्टीवर हे अत्याधुनिक हेलिपॅड उभारण्यात येणार आहे. हे हेलिपॅड दक्षिण मुंबईतील पहिलेच सरकारी मालकीचे सार्वजनिक हेलिपॅड असणार आहे.

# महिला सक्षमीकरणाला प्राधान्य -आमदार प्रशांत ठाकूर

## विचुंबे येथे लाडक्या बहिणींचा मेळावा



**पनवेल : रामप्रहर वृत्त**

सर्वसामान्य नागरिकांचा सर्वांगीण विकास साधत त्यांचे भविष्य सुरक्षित ठेवण्यासाठी भारतीय जनता पक्ष सातत्याने कार्यरत आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि महाराष्ट्राचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या सक्षम नेतृत्वाखाली महिलांच्या सक्षमीकरणाला विशेष प्राधान्य देण्यात येत असून महिलांच्या हिताची काळजी घेणे ही भाजपच्या प्रत्येक कार्यकर्त्याची जबाबदारी असल्याचे प्रतिपादन आमदार प्रशांत ठाकूर यांनी केले.

विचुंबे येथे दुर्गा माता महिला मंडळ आणि ग्रामस्थ मंडळ विचुंबे यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित करण्यात आलेल्या 'लाडकी बहीण' मेळाव्यात ते बोलत होते. या वेळी त्यांनी पंचायत समिती आणि जिल्हा परिषद या स्थानिक स्वराज्य संस्थांच्या माध्यमातून महिलांचा आवाज बुलंद करण्यासाठी भाजप महायुतीच्या पालीदेवद जिल्हा परिषद गटाच्या उमेदवार प्राची अमित जाधव आणि विचुंबे पंचायत समिती गणाच्या उमेदवार नीलम प्रमोद भिंगारकर या दोन भगिनी सज्ज असल्याचे आवर्जून नमूद केले. या मेळाव्यात महिलांसाठी विविध सांस्कृतिक कार्यक्रम तसेच मनोरंजनात्मक खेळांचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमांना महिलांचा उत्स्फूर्त आणि मोठ्या संख्येने प्रतिसाद लाभला.

या कार्यक्रमास आमदार प्रशांत ठाकूर यांच्यासह भाजपचे राज्य परिषद सदस्य अरुणशेठ भगत, **(पान २ वर..)**

# एसटी चालकांच्या मद्यपानाविरुद्ध कडक पावले



## मुख्यालयाकडून कठोर निर्देश

**मुंबई : प्रतिनिधी**

२५ जानेवारी रोजी परिवहन मंत्री तथा एसटी महामंडळाचे अध्यक्ष प्रताप सरनाईक यांनी अचानकपणे परळ बसस्थानकाला भेट दिली. त्यावेळी चालक -वाहक विश्रांतीगृहांमध्ये अनेक ठिकाणी मद्याच्या रिकाम्या बाटल्या आढळल्या . तसेच काही कर्मचारी मद्यपान केल्याचे देखील आढळून आले. या पार्श्वभूमीवर राज्यातील सर्व आगारात कर्तव्यावर जाण्यापूर्वी चालकांची ब्रेथ आणलायझर चाचणी अनिवार्य करण्याचे निर्देश मंत्र्यांनी दिले. त्यानुसार कर्तव्यावर असताना मद्यपान करणाऱ्या एसटी चालकांविरुद्ध कठोर आणि तातडीची कारवाई करण्याचे स्पष्ट निर्देश राज्य परिवहन महामंडळाच्या मुख्यालयाकडून देण्यात आले आहेत.

प्रवाशांच्या सुरक्षेला सर्वोच्च प्राधान्य देत ही मोहीम अधिक काटेकोरपणे राबविण्यात येणार आहे. महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळाच्या यंत्र अभियंता (चालन) विभागामार्फत सर्व विभाग नियंत्रक, विभागीय कार्यशाळा तसेच संबंधित अधिकाऱ्यांना परिपत्रकाद्वारे सूचना देण्यात आल्या आहेत. या सूचनांनुसार, कर्तव्यावर जाण्यापूर्वी चालकाने मद्यपान केले नसल्याची खात्री करणे आता अधिक सक्तीचे करण्यात आले आहे. आगार व्यवस्थापकांनी अशा प्रकरणांची स्वतः खात्री करून संबंधित चालकांविरुद्ध नियमानुसार तातडीने शिस्तभंगाची कारवाई करावी, असेही स्पष्ट करण्यात आले आहे. यासोबतच, मुख्यालयाकडून अचानक तपासण्या (सरप्राइज चेक) घेण्यात येणार असल्याने सर्व आगारांनी या सूचनांची काटेकोर अंमलबजावणी करणे बंधनकारक करण्यात आले आहे.

एसटी ही राज्यातील सर्वसामान्यांची जीवनवाहिनी मानली जाते. त्यामुळे चालकांची शारीरिक व मानसिक स्थिती उत्तम असणे अत्यावश्यक आहे. मद्यपान करून वाहन चालविणे ही गंभीर बाब मानून महामंडळाने शून्य सहनशीलता धोरण अवलंबले असल्याचे या परिपत्रकातून स्पष्ट झाले आहे.

या निर्णयामुळे प्रवाशांच्या सुरक्षेत अधिक वाढ होणार असून एसटी सेवेत शिस्त आणि जबाबदारी अधिक मजबूत होईल, अशी अपेक्षा परिवहन मंत्री तथा एसटी महामंडळाचे अध्यक्ष प्रताप सरनाईक यांनी व्यक्त केली जात आहे.

### तपासणी अधिक कडक

***१)कर्तव्यावर जाणाऱ्या चालकांनी मद्यपान केले नसल्याची खात्री करूनच त्यांना ड्युटीवर पाठविण्यात यावे. २)ज्या चालकाला विशिष्ट वाहनावर कर्तव्य देण्यात येणार आहे, त्या वाहनासोबतच त्याची अल्कोहोल तपासणी (ब्रिथ ॲनालायझर चाचणी) करण्यात यावी. ३)वाहन परीक्षकांनी चालकाची तपासणी न करता वाहन बाहेर जाऊ देऊ नये. ४)मद्यपान केल्याचे निदर्शनास आल्यास संबंधित चालकाला तत्काळ कर्तव्यातून दूर ठेवून त्याची माहिती आगार व्यवस्थापकांना द्यावी***

## मंत्री राणेंच्या पोलादपूरमध्ये सभा

**पोलादपूर : प्रतिनिधी**

भाजप-राष्ट्रवादी काँग्रेस युतीच्या उमेदवारांच्या प्रचारासाठी मत्स्यव्यवसाय मंत्री नितेश राणे ३१ जानेवारी रोजी प्रचार दौऱ्यावर येणार असल्याची माहिती भाजपचे गटनेते व कॅबिनेट दर्जाचे आ.प्रवीण दरेकर यांनी दिली. यावेळी रायगड लोकसभाचे खासदार तसेच राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्षाचे प्रदेशाध्यक्ष सुनील तटकरे आणि महिला व बालकल्याणमंत्री ना.अदिती तटकरे यांच्यासह भाजपचे गटनेते व कॅबिनेट दर्जाचे आ.प्रवीण दरेकर हेदेखील उपस्थित राहणार आहेत.

पोलादपूर तालुक्यातील लोहारे जिल्हा परिषद गटातील भाजप उमेदवार कृष्णा कदम आणि कोतवाल बुद्रुक पंचायत समितीचे भाजप उमेदवार सुरेंद्र चव्हाण यांच्यासह राष्ट्रवादी काँग्रेसच्या लोहारे गणातील उमेदवार युगज्ञा उतेकर या उमेदवारांच्या प्रचारसभांचे आयोजन पैठण येथे दुपारी ३ वाजता तर लोहारे येथे सायंकाळी ५ वाजता करण्यात आल्याचे या वेळी प्रसिध्दीमाध्यमांना सांगण्यात आले.

## सानपाड्यात उद्या अजितदादांप्रती शोकसभा

**नवी मुंबई :** उपमुख्यमंत्री अजित पवार यांना विविध स्तरावरून श्रद्धांजली वाहण्यात येत आहे. नवी मुंबईतदेखील सर्वपक्षीय शोकसभेचे आयोजन करण्यात आले आहे. सानपाडा केमिस्ट भवन येथे शनिवार ३१ जानेवारी रोजी सायंकाळी ७ वाजता शोकसभेचे आयोजन करण्यात आले आहे. सर्वपक्षीयांना यात शोकसभेचे आमंत्रण देण्यात आले आहे.

# मुरूड टोकेखार-तुरुंबाडी पुलाचे काम जलदगतीने सुरू

## रायगडच्या विकासासाठी हा पूल अतिमहत्त्वाचा



**मुरुड : रामप्रहर वृत्त**

महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळाने (एम.एस.आर.डी.सी.) ८०९ कोटी खर्चून ४.३ किमी लांबीच्या अगरदांडा खाडी पुलासाठीच्या निविदा काढल्या , ज्यात टोकेखार - तुरुंबाडी गावांदरम्यानच्या नागरी बांधकामासाठी हिंदुस्थान कन्स्ट्रक्शन कंपनी (एचसीसी) ठेका देण्यात आला .रायगड जिल्ह्यातील राज्य महामार्ग एसएच-४ (रेवस - रेड्डी किनारी महामार्ग) वरील या दोन पदरी पुलाच्या बांधकामाला महाराष्ट्र सरकारच्या मंत्रिमंडळाने जानेवारी २०२४ च्या मध्यात मंजुरी दिली होती. हा पूल अदानी पोर्ट्स अँड एसईझेडच्या दिघी बंदर प्रकल्पाच्या पूर्वेला बांधला जातोय या पूल ;यामुळे श्रीवर्धन व मुरुड तालुका जोडला जाणार असून दोन्ही तालुक्यात पर्यटन मोट्या प्रमाणात वाढणार आहे

ज्याचा अंदाजित खर्च ८०९.८९ कोटी रुपये आणि बांधकामाची मुदत ३० महिने होती, तसेच अतिरिक्त १० वर्षांच्या देखभालीचा कालावधी होता. ह्यापूलसाठी अंदाजे २००० कामगार लागणार आहे सद्य १००० कामगार काम करत आहेत .पुढील काळात कामगाराची गरज असणार आहे .त्यासाठी मुरुड परिसरातील युवांना प्रशक्षित करून काम देण्याबाबदात खासदार सुनिलजी तटकरे यांनी मागणी केली आहे .त्यांनी प्रकल्प पाहणीच्या वेळी अधिकाऱ्यांना सूचना केल्या होत्या .अजूनही मुरुड तालुकयातील तरुणांना काम मिळत नाही याकडे लोकप्रतिनिधींनी पाहण्याची गरज आहे

मुरूडहून श्रीवधन व दिवेआगर ,रत्नागिरी कडे जाण्यासाठी रेवस - रेड्डी किनारी महामार्ग तयार होणार आहे त्यासाठी या पुलाचे काम सुरु आहे .सद्य श्रीवर्धनला जाण्यासाठी रोरो बोटीतून जावे लागते ,वेळी जास्त लागतो पैसे ह्या यापूलमुळे श्रीवर्धन फक्त ४० किमी अंतर होणार आहे .त्यामुळे श्रीवर्धनच्या मुंबईला जाणाऱ्या गाड्या मुरूडहून जाणार असल्याने मुरुड बाजारात आर्थिक उलाढाल वाढेल.

सागरी महामार्गातील महत्वाचे दोन टप्पे कारंजा ते रेवस व दूसरा टप्पा टोकेखार ते तुरुंवाडी पुलामुळे मुंबईहून श्रीवर्धनल २ तासात पर्यटक सामुद्राचा आनंद घेत प्रवास करू शकतो . पर्यटनाच्या विकासात सागरी महामार्ग महत्वाची भूमिका साकारणार आहे . प्रांतप्रधान नरेंद्र मोदींची कोकणातील सागरी महामार्ग व पर्यटन विकासाबाबत विशेष नियिजन असल्येने या महामार्गाला जोडणारे सर्व पूल तातडीने करण्याचे आदेश राज्य शासनाला देण्यात आले.

# वाचनाने माणूस समृद्ध होतो

## आयएएस रमेश चव्हाण यांचे प्रतिपादन



**नवी मुंबई : प्रतिनिधी**

पूर्व प्राथमिक इंग्रजी विभागातर्फे वार्षिक पारितोषिक वितरण समारंभ २०२५-२६ व स्नेहसंमेलनाचे आयोजन करण्यात आले . या समारंभास कामगार राज्य विमा योजना चे आयुक्त आय. ए. एस. रमेश चव्हाण प्रमुख अतिथी म्हणून उपस्थित होते. संस्थेचे कार्याध्यक्ष राजेन्द्र बोऱ्हाडे व कुलसचिव दिनेश मिसाळ यांचीही याप्रसंगी प्रमुख उपस्थिती होती.

या समारंभात कल्पना स्वॅन व शितल बाबर यांनी पीपीटीद्वारे वार्षिक अहवाल सादर केला पूर्व प्राथमिक विभागाच्या पर्यवेक्षिका अस्मिता सलगर यांनी प्रमुख अतिथींचा परिचय करून दिला, संस्थेचे कार्याध्यक्ष राजेंद्र यांच्या हस्ते रमेशजी चव्हाण यांचा स्वागत सत्कार करण्यात आला.आय. ए. एस. रमेश चव्हाण यांनी विद्यार्थ्यांनी वाचनावर भर द्यावा, वाचन आपल्याला विचार करायला शिकवते व त्यातून माणूस घडतो. त्याकरिता मोबाईल व सोशल मीडिया यांना कमीतकमी वेळ देऊन मुलांना वाचनाची आवड कशी लागेल याचा प्रयत्न केला पाहिजे, असे आवाहन उपस्थित पालकांना केले.

विविध शालेय व सहशालेय स्पर्धांमध्ये पारितोषिक प्राप्त विद्यार्थ्यांचा पालकांसह प्रमुख अतिथींच्या हस्ते नगरसेवक सचिन लवटे पुरस्कृत बक्षिसे देऊन गुणगौरव करण्यात आला.

# नवी मुंबई महापालिकेच्यावतीने अजित दादांना भावपूर्ण श्रध्दांजली



**नवी मुंबई : बातमीदार**

महाराष्ट्र राज्याचे उपमुख्यमंत्री अजित पवार यांचे दि. २८ जानेवारी २०२६ रोजी बारामती येथे विमान अपघातात आकस्मिक झालेल्या दु:खद निधनामुळे संपूर्ण देश शोकसागरात बुडाला. ऐकल्यानंतर विश्वास बसणार नाही अशी सर्वांना नि:शब्द करुन टाकणारी ही दुर्दैवी घटना प्रत्येकाला सून्न करुन टाकणारी होती.

नवी मुंबई महानगरपालिकेच्या वतीने महापालिका मुख्यालयातील म्फिथिएटर येथे अजितदादा पवार यांच्या प्रतिमेला आयुक्त डॉ. कैलास शिंदे यांच्या हस्ते पुष्पमालिका अर्पण करुन, अतिरिक्त आयुक्त सुनिल पवार, सर्व विभागप्रमुख व अधिकारी, कर्मचारी आणि अभ्यागत नागरिक यांच्या उपस्थितीत स्तब्ध उभे राहून भावपूर्ण श्रध्दांजली अर्पण करण्यात आली.

महाराष्ट्राच्या जडणघडणीत अनमोल योगदान असणा-या अजित पवार यांच्यासारख्या महनीय नेतृत्वाच्या अचानक निधनामुळे महाराष्ट्राची व प्रशासनाची फार मोठी हानी झाली असल्याचे सांगत महापालिका आयुक्त डॉ. कैलास शिंदे यांनी त्यांच्या आत्म्यास चिरशांती लाभो व त्यांच्या कुटूंबियांना या दु:खातून सावरण्याची शक्ती लाभो अशा शब्दात श्रध्दांजली अर्पण केली. आयकॉनिक इमारत म्हणून ओळखल्या जाणा-या नवी मुंबई महानगरपालिकेच्या मुख्यालय इमारतीच्या पायाभरणीपासून उभारणीपर्यंत तसेच महापालिका क्षेत्रातील विविध विकास कामांना गती देण्यात व अनेक प्रसंगात त्यांचे योगदान लाभले. जे कधीही विसरता येणार नाही असे आयुक्त म्हणाले. मंत्रालय सेवेत असतांना त्यांच्या कामाची पध्दत जवळून पाहता आली. साता-यामध्ये काम करतांना त्यांचे मार्गदर्शन लाभले. कोव्हीड काळात पालघरचा जिल्हाधिकारी असतांना मोठया प्रमाणावर कामगार आपल्या गावी स्थलांतर करीत होते अशा वेळी आवश्यक प्रसंगी रात्री २ वाजताही त्यांच्याशी बोलणे झाले व त्यांनी लगेच मदतही केली. सिडकोत असतांनाही त्यांचे विविध गोष्टींमध्ये मार्गदर्शन मिळाले अशा विविध ठिकाणच्या आठवणी आयुक्तांनी कथन केल्या.

दुर्दैवी विमान अपघातात उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्यासह निधन झालेले त्यांचे सुरक्षारक्षक विदीप जाधव, पायलट कॅ. सुमित कपूर, कॅ. शांभवी पाठक, फ्लाईट अटेंडन्ट पिंकी माळी यांच्याही आत्म्यास चिरशांती लाभो अशी सामूहिक प्रार्थना करीत सर्वांनी स्तब्ध उभे राहून भावपूर्ण श्रध्दांजली अर्पण केली.

# निरंकारी सामूहिक विवाह सोहळ्यात ८२ जोडपी विवाहबद्ध

**सांगली : प्रतिनिधी**

निरंकारी सतगुरु माता सुदीक्षाजी महाराज व निरंकारी राजपिताजी यांच्या प्रमुख उपस्थिती मध्ये आयोजित करण्यातआलेल्या सामूहिक विवाह सोहळ्यात महाराष्टासह देशभरातील विविध भागातील ८२ जोडप्यांचा विवाह संपन्न झाला.

महाराष्टाच्या ५९व्या वार्षिक निरंकारी संत समागमाची विधिवत सांगता झाल्यानंतर सांगली येथील संतसमागम मैदानावर या सोहळ्याचे आयोजन करण्यात आले. नव विवाहित वधू-वरांना सतगुरु मातासुदीक्षाजी महाराज यांनी एकमेकांचा आदर-सत्कार करत प्रेमपूर्वक आणि भक्तीभावनेने कर्तव्यांचे पालन करत जीवन व्यतीत करण्याचा आशीर्वाद प्रदान केला व त्यांना शुभेच्छा दिल्या.

या सामूहिक विवाह सोहळयामध्ये पारंपारिक जयमाला तसेच सांझा-हार म्हणजेच सामायिक हार प्रत्येक जोडीच्यागळ्याामध्ये मिशनच्या प्रतिनिधींमार्फत घालण्यात आले. त्यानंतर आदर्श गृहस्थ जीवन जगण्याची शिकवण प्रदान करणाऱ्या निरंकारी लावांचे सुमधूर गायन करण्यात आले.समारोहामध्ये सतगुरु माताजी व निरंकारी राजपिताजी यांनी वधूवरांवर पुष्प-वर्षा करुन आपला दिव्य आशीर्वाद प्रदान केला.

विशेष म्हणजे या साध्या विवाह समारंभात अनेक पदवीधर, पदव्यूत्तर पदवीधर आणि उच्च शिक्षित वधू-वरांचा समावेश होता. काही परिवार असेही होते जे आपल्या मुलांचे विवाह मोठ्या थाटामाटात करु शकतहोते. परंतु त्यांनी सतगुरुंच्या पावन छत्रछायेमध्ये त्यांच्या दिव्य शिकवणीचा अंगीकार करत साध्या पद्धतीनेविवाह करुन समाजासमोर एक आदर्श उदाहरण प्रस्तुत केले.

# मुरूड तालुक्यात जिल्हा परिषद, पंचायत समिती निवडणुकीचे चित्र स्पष्ट

**मुरुड : प्रतिनिधी**

रायगड जिल्हा परिषद व पंचायत समितीच्या सार्वत्रिक निवडणूक -२०२६ करिता मुरुड तालुक्यातील जिल्हा परिषदेच्या दोन जागांसाठी ५ उमेदवार तर पंचायत समितीच्या चार जागांसाठी १३ उमेदवार रिंगणात आहेत

रायगड जिल्हा परिषदेच्या ३८ राजपुरी - अजित पवार राष्ट्रवादी काँग्रेस अजित बाळकृष्ण कासार तर शिंदे शिवसेना विघ्नेश विजय माळी , ३७ कोर्लई -शिंदे शिवसेना ज्योती रमेश नागावकर, उद्धवसेना राजश्री प्रशांत मिसाळ,भाजप पक्षांकडून ॲड. मनस्वी महेश मोहीते या उमेदवार असुन या ठिकाणी तिरंगी लढत होणार आहे.

मुरुड पंचायत समितीच्या ७३ बोर्ली शिंदे शिवसेना निलेश शांताराम घाटवळ, अजित पवार राष्ट्रवादी काँग्रेस संजय हरिश्चंद्र महाडीक ,शेकाप वामन केशव चुनेकर तर अपक्ष अंकिता अरविंद पोवळे हे उमेदवार असुन या ठिकाणी चौरंगी लढत होणार आहे. कोर्लई-शिंदे शिवसेना स्वाती आशिष चवरकर ,भाजप अश्विनी जयवंत डोंगरीकर उद्धवसेना सिध्दी शरद पाटील नांदगाव-भाजप रमेश हरी दिवेकर ,शिंदे शिवसेना गणेश प्रभाकर नाक्ती भारतीय काँग्रेस अस्लम हुसेन हलडे,शेकाप निता विजय गिदी . राजपुरी -शिंदे शिवसेना अश्विनी संजय जंगम. शेकाप सुनिता कृष्णा वाघमारे हे उमेदवार असणार आहेत.

# उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या निधनाने रसायनीत शोककळा

**मोहोपाडा : प्रतिनिधी**

राज्याचे उपमुख्यमंत्री अजित पवार यांचा बारामतीतील विमान अपघातात दुर्दैवी मृत्यू झाला. अजित पवार यांच्या अपघाती निधनामुळे राज्यात शोककळा पसरली असून सगळ्याच क्षेत्रात हळहळ व्यक्त केली जात आहे. यातच अजित पवार यांचे विमान अपघातात निधन झाल्याचे समजताच रसायनी येथील खंदे समर्थक माजी सरपंच संदीप सुदाम मुंढे यांच्या डोळ्यांतून अश्रू अनावर झाले.

ऐन जिल्हा परिषद व पंचायत समिती निवडणूक असल्याने बुधवारी वासांबे परिसरात त्यांनी प्रचार बंद ठेवला. वासांबे जिल्हा परिषद विभागातील अजित पवार गटाच्या समर्थकांत शोककळा पसरली आहे. परिसरात हळहळ व्यक्त केले जात आहे.

दरम्यान, अजित पवार हे ६६ वर्षांचे होते. राज्याच्या राजकारणात मागील ४० वर्षांपासून अजित पवार यांचा वावर होता. धडाकेबाज निर्णय घेण्याची क्षमता, रोखठोक भाष्य यामुळे अजित पवार चर्चेत राहिले होते.

पान १ वरुन

## पनवेल महानगरपालिकेतील महायुतीची अधिकृत गट नोंदणी



याआधी नवनिर्वाचित नगरसेवक व नगरसेविकांच्या संयुक्त बैठकीत महायुतीच्या गटनेतेपदी नितीन जयराम पाटील यांची निवड करण्यात आली होती. गुरुवारी झालेल्या गट नोंदणी प्रक्रियेमुळे नितीन पाटील यांची गटनेतेपदी शासनाकडे अधिकृत नोंद करण्यात आली आहे. महायुतीची गट नोंदणी पूर्ण झाल्यानंतर आता महापौर व उपमहापौर पदांसाठी निवडणूक प्रक्रिया येत्या १० फेब्रुवारी रोजी पार पडणार आहे.

## चौलमध्ये वृद्धेचा गळा आवळून खून

घराच्या पाठीमागील दरवाजा उघडा असल्याचे दिसून आले. घरात प्रवेश केल्यानंतर मंदा म्हात्रे या किचनमध्ये बेशुद्ध अवस्थेत पडलेल्या आढळून आल्या. तपासणी केली असता त्यांचा मृत्यू झाल्याचे स्पष्ट झाले.

पोलिसांच्या प्राथमिक पाहणीत त्यांच्या डाव्या कानाखाली जखम आढळून आली असून मानेच्या उजव्या बाजूला दोन वळ (खुणा) दिसून आल्या आहेत. कानातील सोन्याच्या रिंगा व गळ्यातील सोन्याची माळ जबरदस्तीने काढण्यात आल्याचे स्पष्ट झाले आहे. दागिने लुटताना झालेल्या झटापटीतच त्यांचा मृत्यू झाल्याचा संशय पोलिसांनी व्यक्त केला आहे

या प्रकरणी फिर्यादी प्रमोद शांताराम म्हात्रे यांच्या तक्रारीवरून रेवदंडा पोलीस ठाण्यात गुन्हा रजिस्टर क्रमांक १२/२०२६ अन्वये अज्ञात व्यक्तीविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. सदर गुन्हा भारतीय न्याय संहिता कलम१०३/१ ३११ व ३३१(७) अन्वये नोंद करण्यात आला असून जबरी चोरी करताना खून झाल्याचा गुन्हा असल्याचे पोलिसांनी स्पष्ट केले आहे.

## महिला सक्षमीकरणाला प्राधान्य;

## विचुंबे येथे लाडक्या बहिणींचा मेळावा

माजी जिल्हा परिषद सदस्य अमित जाधव, सरपंच प्रमोद भिंगारकर, बळीराम पाटील, अविनाश गायकवाड, अनिल भोईर, अनंत गायकवाड, विवेक भोईर, चेतन सुरते, श्रावणी भोईर, आरती गायकवाड, विभूती सुरते, प्रगती गोंधळी, स्वाती पाटील, भाग्यश्री भोईर, हर्षदा भिंगारकर, निकिता म्हात्रे, अमित म्हात्रे, कविता भोईर, प्राजक्ता भोईर, प्रमिला म्हात्रे, ज्योती भोईर, सोनम म्हात्रे, प्रणाली पाटील यांच्यासह भाजपचे पदाधिकारी, कार्यकर्ते, ग्रामस्थ आणि महिला मोठ्या संख्येने उपस्थित होते.



## दुखवटा

### अनुराधा औंधे



**मोहोपाडा :** वासुदेव औंधे(उर्फ दादा) त्यांच्या धर्मपत्नी कै.अनुराधा औंधे यांचे वयाच्या ८४ वर्षी वृद्धापकाळाने निधन झाले. त्यांच्या पश्चात पती वासुदेव औंधे माजी (CMD) सी एम डी रसायनी येथील एच ओ सी कंपनीमध्ये होते तसेच बिझनेस मॅन मुलगा राजीव औंधे संजीव औंधे ,साधना औंधे, नातू निलय औंधे, नात तनुजा औंधे व त्यांच्या मागे औंधे परिवार दुःख सागरात बुडाला आहे.त्यांच्या मृत्यू प्रित्यर्थ धार्मिक विधी राहत्या घरी ठाणे वेस्ट एल बी सी मार्ग रहेजा गार्डन्स गेट नंबर३ येथे होणार आहेत.

# भाजप महायुतीच्या उमेदवारांचा जोरदार प्रचार सुरू

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

केळवणे, दिघाटी, कल्हे, बांधणवाडी, लहुचीवाडी, विठ्ठलवाडी, ब्राम्हणडुंगी, आखाडावाडी, बानूबाईवाडी (बारापाडा) येथे केळवणे जिल्हा परिषद व केळवणे पंचायत समिती येथे भाजप व शिवसेना व आरपीआय युतीचा प्रचार करण्यात आला. या वेळी केळवणे जिल्हा परिषद गटाचे क्र -८ उमेदवार मंगेशजी रामचंद्र वाकडीकर व केळवणे पंचायत समिती गण क्र-१५ चे उमेदवार शितलताई अनंत माळी यांना बहुमताने विजयी करण्याचे आवाहन नागरिकांना करण्यात आले.



## केळवणे परिसरात मंगेश वाकडीकर, शितल माळींना विजयी करण्याचे आवाहन

या वेळी जिल्हा परिषदचे सदस्य ज्ञानेश्वर घरत, पनवेल पंचयात समितीचे मा. उपसभापती जिवन म्हात्रे, केळवणे जिल्हा परिषद विभागाचे अध्यक्ष विद्याधर जोशी, उद्योगपती बाळूशेठ पाटील, कृषी उत्पन्न बाजार समितीचे मा. सभापती संतोष पाटील, मा. केळवणे पंचायत समिती अध्यक्ष हिरामण ठाकूर, केळवणे गाव अध्यक्ष सुशिल ठाकूर, दिघाटी ग्रामपंचयात सरपंच रजनी ठाकूर, साईचे मा. सरपंच विद्याधर मोकल, केळवणे माजी उपसरपंच भानुदास गावंड, शेखर कानाडे, माजी उपसरपंच दत्तात्रेय पाटील, रत्नाकर घरत, शेखर पाटील, गणेश पाटील, भाजप नेते प्रफुल्ल पाटील , केळवणे गाव अध्यक्ष रामचंद्र मोकल, कासरभट ग्रापंचयात सदस्य सुजित पाटील, अमित पाटील, उज्ज्वला ठाकूर आदी पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.

## आवरे पंचायत गणात देवेंद्र पाटील, समिधा म्हात्रे यांची प्रचारात मुसंडी

**उरण : प्रतिनिधी**

उरण तालुक्यात जिल्हा परिषद, पंचायत समिती निवडणुकीत आवरे गणात भारतीय जनता पक्षाचे चिरनेर जिल्हा परिषद मतदार संघातील उमेदवार देवेंद्र विनायक पाटील आणि आवरे पंचायत समिती गणातील उमेदवार तथा उरण पंचायत समितीच्या माजी सभापती सौ. समिधा निलेश म्हात्रे यांनी काल आवरे पंचायत गणात मतदारांच्या भेटी गाठी घेण्यासाठी काढण्यात आलेल्या प्रचार फेरीत मुसंडी मारली आहे.



आवरे गणात मागील पाच वर्षात उरण पंचायत समितीच्या माध्यमातून विविध विकास कामे पूर्णतःवास गेली आहेत. त्यामुळे या आवरे पंचायत समिती गणातून चिरनेर जिल्हा परिषदेचे उमेदवार देवेंद्र पाटील व आवरे पंचायत गणातील उमेदवार समिधा म्हात्रे यांना येथील मतदारांचा उत्स्फूर्त पाठिंबा मिळत आहे.

या प्रचार रॅलीत उरण तालुका भारतीय जनता पार्टीच्या अध्यक्षा राणी म्हात्रे, निलेश म्हात्रे, सुरज म्हात्रे, शाखा अध्यक्ष किशोर वर्तक, समाधान वर्तक, स्वप्निल म्हात्रे, विक्रांती म्हात्रे, अमोल पाटील, सागर म्हात्रे प्रितम वर्तक व हर्षद म्हात्रे यांच्यासह येथील कार्यकर्ते आणि महिलांनी मोठा सहभाग घेतला असून, भारतीय जनता पक्षाच्या उमेदवारांनी प्रचारात मुसंडी मारली आहे.

## चिरनेर परिसरात भाजप उमेदवारांच्या प्रचाराला उत्स्फूर्त प्रतिसाद

**उरण : प्रतिनिधी**

रायगड जिल्हा परिषद व पंचायत समितीच्या सार्वत्रिक निवडणुकीच्या प्रचाराला वेग आला असून, चिरनेर जिल्हा परिषद गटाचे भारतीय जनता पार्टी, शिवसेना, आरपीआय महायुतीचे उमेदवार देवेंद्र विनायक पाटील व चिरनेर पंचायत समिती गणातील भारतीय जनता पक्ष, शिवसेना, आरपीआय महायुतीच्या उमेदवार साक्षी सुजित पाटील यांचा चिरनेर, कळंबुसरे परिसरात घर टू घर जाऊन प्रचार करण्यात आला.



या वेळी उमेदवारांचे चिरनेरसह इतर गावांमध्ये जल्लोषात स्वागत करण्यात आले. दरम्यान कार्यकर्ते व मतदारांनी मोठी गर्दी केली होती. कार्यकर्त्यांच्या गर्दीने संपूर्ण परिसर गजबजून गेला होता. तालुक्यातील चिरनेरसह अनेक गावांमध्ये गुरुवारी (दि. २९) या जिल्हा परिषदेच्या व पंचायत समितीच्या दोन्ही उमेदवारांच्या प्रचाराला सुरुवात झाली. प्रचारा दरम्यान उमेदवारांचे चिरनेर परिसरातील गावांमध्ये आगमन होताच त्याचे स्वागत करण्यात आले. या वेळी त्यांनी गावातील मंदिरात जाऊन देवदर्शन घेऊन प्रचाराचा नारळ फोडला.

प्रचारादरम्यान भाजपच्या चिरनेर पंचायत गणाच्या उमेदवार साक्षी पाटील यांचे सासरे तथा शेतकरी कामगार पक्षाचे ज्येष्ठ नेते व चिरनेर ग्रामपंचायतीचे तत्कालीन सरपंच स्वर्गीय अनंत पाटील यांच्या चिरनेर येथील निवासस्थानी जाऊन, उमेदवारांनी त्यांच्या स्मृतींना अभिवादन करून, आशीर्वाद घेतले. यावेळी उमेदवारांनी आणि प्रमुख कार्यकर्त्यांनी नागरिकांबरोबर संवाद साधून कमळ चिन्हा समोरील बटन दाबून निवडून देण्याचे आवाहन केले. प्रचारात महिला, तरुण मंडळी, जेष्ठ कार्यकर्ते स्वयंस्फूर्तीने सहभागी झाले होते. एक वेगळा उत्साह या निमित्ताने दिसून आला.

प्रचारात देवेंद्र पाटील व साक्षी पाटील यांना उत्स्फूर्त प्रतिसाद मिळत असल्याचे दिसून आले. या वेळी भारतीय जनता पार्टीचे राजाशेठ खारपाटील, सुशांत पाटील, सुधीर पाटील, रमेश फोफेरकर, कुलदीप नाईक, सुशील राऊत, रुपेश पाटील, जयेश खारपाटील, समीर डुंगीकर, नंदकुमार चिरनेरकर, स्वप्निल पाटील, प्रियांका पाटील, संध्या ठाकूर, जगदीश ठाकुर, जगन्नाथ ठाकूर, मनोज खारपाटील, महेंद्र ठाकूर, नमस्ते मोकल, रुपेश नारंगीकर यांच्यासह भारतीय जनता पार्टीच्या महायुतीचे अनेक पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.

## महेश साळुंखेंकडून महायुतीला विजयी करण्याचे आवाहन

**पनवेल : वार्ताहर**

स्वाभिमानी युथ रिपब्लिकन पार्टीचे रायगड जिल्हा अध्यक्ष महेश साळुंखे यांनी गव्हाण, वडघर, पळस्पे आणि सुकापुर जिल्हा परिषद मतदार संघातील कार्यकर्त्यांच्या भेटीगाठी घेऊन महायुतीच्या उमेदवारांचा प्रचार सुरू केलेला आहे.

याचप्रमाणे पनवेल तालुक्यातील सर्व आठही जिल्हा परिषद मतदार संघातील प्रमुख कार्यकर्त्यांची बैठक ३० जानेवारी रोजी त्यांच्या निवासस्थानी आयोजित केलेली आहे. या बैठकीमध्ये जिल्हा परिषद आणि पंचायत समितीच्या महायुतीच्या सर्व उमेदवारांच्या प्रचाराविषयी मार्गदर्शन करण्यात येणार आहे. त्याचबरोबर महाड येथे होणाऱ्या क्रांती दिनाच्या निमित्त आयोजित सभेच्या पूर्वतयारी विषयी सुद्धा चर्चा करण्यात येणार आहे.

साळुंखे यांनी यांच्या संपर्कात असलेल्या सर्व सामाजिक संघटना व विविध क्षेत्रातील मान्यवरांच्या गाठीभेटी घेणे सुरू केलेले आहे. यासोबत महायुतीच्या उमेदवारांना मतदान करण्याविषयी ते आवाहन करत आहेत.

## गरोदर अवस्थेतही उमेदवार हर्षदा घरत यांचा गावोगावी प्रचार

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

पळस्पे जिल्हा परिषद गट क्रमांक ४ मधील उमेदवार हर्षदा अतुल घरत यांची सात ते आठ महिन्यांची गरोदर अवस्था असतानाही त्या गावोगावी प्रचार रॅलीत सहभागी होत आहेत.

रायगड जिल्हा परिषद व पंचायत समितीच्या निवडणुका होत असून, या पार्श्वभूमीवर भारतीय जनता पार्टीच्या उमेदवारांचा प्रचार वेगाने सुरू आहे. पळस्पे जिल्हा परिषद गट क्रमांक ४ मधून हर्षदा अतुल घरत, पळस्पे पंचायत समिती गण क्रमांक ७ मधून राजेंद्र हरिश्चंद्र पाटील तसेच कोन पंचायत समिती गण क्रमांक



८ मधून योगिता योगेश लहाने हे महायुतीचे उमेदवार निवडणूक रिंगणात उतरले आहेत.

या निवडणुकीत विशेष चर्चा होत आहे ती पळस्पे जिल्हा परिषदमधील उमेदवार हर्षदा अतुल घरत यांची. सात ते आठ महिन्यांची गरोदर अवस्था असतानाही त्या गावोगावी प्रचार रॅलीत सहभागी होत घरोघरी जाऊन ज्येष्ठांचे आशीर्वाद घेताना दिसत आहेत. त्यांचा हा जिद्दीचा व सकारात्मक दृष्टिकोन सर्वत्र कौतुकाचा विषय ठरत आहे.

महिलांसाठी खास आयोजित करण्यात आलेले हळदीकुंकू समारंभ व 'होम मिनिस्टर' धर्तीवरील खेळ पैठणीचा कार्यक्रम विशेष आकर्षण ठरत आहेत. संसार, शेती, कामधंद्याच्या धावपळीतून महिलांना थोडा विरंगुळा, आनंद आणि हास्य मिळावे, तसेच उमेदवारांशी थेट संवाद साधता यावा, या उद्देशाने हे कार्यक्रम गावोगावी राबविण्यात येत आहेत.

हर्षदा घरत यांच्या चेहऱ्यावर कायम असलेले हास्य, गोड बोलणे आणि प्रचंड आत्मविश्वास पाहता 'जिद्द, इच्छाशक्ती आणि सकारात्मकतेच्या बळावर काहीही अशक्य नाही' याचे जिवंत उदाहरण त्या ठरत असल्याची भावना मतदारांमध्ये व्यक्त होत आहे. महायुतीच्या तिन्ही उमेदवारांच्या विजयाबाबत गावोगावी सकारात्मक चर्चा सुरू असून प्रचार अंतिम टप्प्यात रंगतदार झाला आहे.



## उमेदवार रीना घरत, राजेंद्र ठाकूर यांच्या प्रचाराचा शुभारंभ

**उरण : वार्ताहर**

येवू घातलेल्या जिल्हा परिषद व पंचायत समिती निवडणुकीत उभे असलेले भाजप उमेदवारांनी उरण तालुक्यातील नागाव, जरीमरी मंदिर, घोसपदा, केगाव, बाजारपूर, दांडा येथे प्रचार सुरू केले आहे. जिल्हा परिषद भाजप उमेदवार रीना जितेंद्र घरत तसेच पंचायत समिती भाजप उमेदवार राजेंद्र ठाकूर यांच्या उपस्थितीत मंगळवारी (दि.२७) प्रचाराचा शुभारंभ करण्यात आला.

या वेळी भाजप चाणजे विभाग अध्यक्ष जितेंद्र घरत, स्वप्निल माळी, समीर कुठे सुरज ठवळे, बाळासाहेब भोजने संतोष लवेकर रोहन पाटील हरेश कातकरी मिलिंद सोनावणे नागाव ग्रामपंचायत सदस्य दीपिका पाटील, अमृता घरत, जितेंद्र नाईक, विनया ठाकूर, निलेश थाळी, वीरेंद्र ठाकूर, कार्यकर्ते दीपेश कोळी गणेश पाटील चे कार्यकर्ते रवींद्र घरात मंगेश म्हात्रे, सुहास पाटील, वीरेंद्र घरत तसेच महिला वर्ग वनिता कडू, नीता घरत, मयुरी पाटील, रजनी घरत, मीना म्हात्रे, अनेक कार्यकर्ते व मान्यवर सहभागी झाले होते.



**पनवेल : भाजप कळंबोली दिव्यांग सेलचे अध्यक्ष दत्तात्रेय भिसे यांना वाढदिवसानिमित्त माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी शुभेच्छा दिल्या.**

## पनवेल शहर परिसरातून मोटरसायकलींची चोरी

**पनवेल : वार्ताहर**

पनवेल शहर परिसरातून दोन विविध ठिकाणी मोटरसायकलींची चोरी झाल्याची घटना घडली असून यासंदर्भात पनवेल शहर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात करण्यात आला आहे.

पनवेल शहरातील मिडल क्लास सोसायटी येथील यशकमल सोसायटीमध्ये राहणारे संकेत राणे यांनी त्यांच्या राहत्या घराच्या पार्किंग परिसरात उभी करून ठेवलेली ७० हजार रुपये किमतीची काळा व ग्रे रंगाची एमएच ४६ एवाय ९१५० क्रमांकाची बजाज पल्सर एन एस २०० मोटरसायकल अज्ञात चोरट्याने चोरून नेली.

दुसऱ्या घटनेत विचुंबे येथे राहणारे नवनाथ सोनावणे यांनी त्यांची निळया व सिल्वर रंगाची एमएच ४६ एएम ३३२८ क्रमांकाची १५ हजार रुपये किमतीची डिस्कव्हर एम १२५ मोटारसायकल पनवेल रेल्वे स्थानका बाहेरील साईमंदिरा जवळ मोकळया जागेत पार्किंग करून ठेवली असता अज्ञात चोरट्याने चोरून नेली.

या दोन्ही घटनेची नोंद पनवेल शहर पोलीस ठाण्यात करण्यात आली आहे.

## उरण महाविद्यालयात रक्तदान शिबिर

**उरण : रामप्रहर वृत्त**

कोकण ज्ञानपीठ उरण वाणिज्य व कला महाविद्यालयातील राष्ट्रीय सेवा योजना विभाग, लायन्स क्लब उरण, लिओ क्लब उरण, टायगर ग्रुप, राजे शिवाजी मित्र मंडळ उरण यांच्या संयुक्त विद्यमाने महाविद्यालयात भारताच्या प्रजासत्ताक दिनाचे औचित्य साधून रक्तदान शिबिराचे आयोजन केले गेले.



या वेळी महात्मा गांधी मिशन कामोठे नवी मुंबईच्या ब्लड बँकेचे सहाय्य घेण्यात आले. महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. व्ही व्ही गर्जे, एम जे एफ ला.मा. सदानंद गायकवाड, लायन्स क्लबचे अध्यक्ष रावसाहेब ओहळ, उपाध्यक्ष संदीप सदानंद गायकवाड, माजी विद्यार्थी संघाचे अध्यक्ष विशाल पाटेकर आदी मान्यवरांच्या उपस्थितीत रक्तदान शिबिराचे उद्‌घाटन करण्यात आले. महाविद्यालयाच्या वतीने शैक्षणिक वर्ष २०२५-२६ मध्ये दुसऱ्यांदा रक्तदान शिबिर आयोजित केले गेले, या रक्तदान शिबिरात एकूण ६० रक्तदात्यांनी रक्तदान केले व आपली सामाजिक बांधिलकी त्या माध्यमातून जपण्याचा प्रयत्न केला, महात्मा गांधी मिशनचे डॉ. शुभम शिंगारे, डॉ. नम्रता भोईर, डॉ. प्राची घरत, डॉक्टर निकिता चोरट आदींनी मोलाचे सहकार्य केले.


महाविद्यालयातील राष्ट्रीय सेवा योजना विभागातील सदस्य, सर्व शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी व राष्ट्रीय सेवा योजनेच्या स्वयंसेवकांनी रक्तदान शिबिराच्या आयोजनात महत्त्वाची भूमिका बजावली.

## व्यसनमुक्तीसंदर्भात उरण पोलीस ठाणे येथे मार्गदर्शन

**उरण : बातमीदार**

प्रजासत्ताक दिनानिमित्ताने उरण पोलीस विभागाच्या सहकार्याने उरण पोलीस स्टेशन येथे जनजागृती व प्रशिक्षण कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. या कार्यक्रमात दारू व अंमली पदार्थांच्या व्यसनमुक्ती क्षेत्रात कार्यरत असलेले दार्शनिक दृष्टीकोनातून काम करणारे दर्शन नाईक व त्यांच्या व्यसनमुक्ती समुदायातील काही सहकारी सहभागी झाले होते.

या वेळी दर्शन नाईक यांनी उरण परिसरात वाढत चाललेल्या अंमली पदार्थांचे सेवन, मद्यपानाचे व्यसन तसेच स्क्रीन (मोबाईल/डिजिटल) व्यसन याबाबत गंभीर चिंता व्यक्त केली. या व्यसनांचा युवकांवर, कुटुंबव्यवस्थेवर आणि सामाजिक सुरक्षिततेवर होणारा परिणाम त्यांनी सविस्तरपणे मांडला.



कार्यक्रमादरम्यान पोलीस अधिकारी व कर्मचाऱ्यांना Alcoholics Anonymous (AA) आणि Narcotics Anonymous (NA) यांसारख्या स्वयं-सहाय्य गटांची माहिती देण्यात आली. व्यसनमुक्तीसाठी उपलब्ध असलेली मदत, बैठकींची रचना, गोपनीयता, तसेच गरजूंना योग्य दिशेने मार्गदर्शन कसे करता येईल याबाबत उपयुक्त माहिती व दृष्टिकोन देण्यात आला. हा उपक्रम यशस्वीरीत्या पार पडण्यासाठी कार्यक्रमाचे आयोजन केल्याबद्दल वरिष्ठ पोलीस निरीक्षक हनीफ मुलानी यांचे विशेष आभार व्यक्त करण्यात आले. तसेच संपूर्ण उरण पोलीस विभागाने दिलेल्या सहकार्याबद्दल धन्यवाद व्यक्त करण्यात आले.

अशा प्रकारचे जनजागृती व प्रशिक्षण कार्यक्रम समाजात व्यसनमुक्तीचा संदेश पोहोचविण्यास व प्रतिबंधात्मक उपाययोजना बळकट करण्यास निश्चितच उपयुक्त ठरतील, असा विश्वास उपस्थितांनी व्यक्त केला.

## दिशा महिला मंचतर्फे संक्रांत मेळावा

**पनवेल : वार्ताहर**

दिशा कल्चरल इव्हेंट्स प्रस्तुत दिशा महिला मंच आयोजित 'संक्रांत मेळावा २०२६' हा कार्यक्रम अत्यंत उत्साहपूर्ण आणि आनंददायी वातावरणात कामोठे येथे पार पडला. महिलांच्या सन्मानासाठी, आत्मसन्मानासाठी व सक्षमीकरणासाठी आयोजित करण्यात आलेल्या या उपक्रमाला महिलांचा मोठा प्रतिसाद लाभला.

या कार्यक्रमाला वरिष्ठ पोलीस निरीक्षक, कामोठे पोलीस ठाणेच्या विमल बिडवे प्रमुख पाहुण्या म्हणून उपस्थित होत्या. साई द्वारका हॉस्पिटलचे डॉ. हेमंत पाटील तसेच धीरज स्नेह उपहारच्या संस्थापिका व समाजसेविका इंदू झा यांचे विशेष सहकार्य लाभले.



या कार्यक्रमास ॲड. रोहिणी साळे व डॉ. गणेश साळे यांचीही प्रमुख उपस्थिती होती.

या कार्यक्रमामध्ये महिलांसाठी हळदी-कुंकू समारंभ,खेळ पैठणीचा, लकी ड्रॉ, विविध मनोरंजनात्मक खेळाचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमाची विशेष बाब म्हणजे पती नसलेल्या (विधवा) महिलांसाठी विशेष हळदी-कुंकू समारंभ राबविण्यात आला.

या कार्यक्रमाला आमदार विक्रांत पाटील यांच्या सुविद्य पत्नी मोहिनी पाटील, नगरसेविका स्नेहल ढमाले, हेमलता गोवारी, शिला भगत, कुसुम म्हात्रे यांची उपस्थिती लाभली. या वेळी त्यांचा सन्मानदेखील करण्यात आला. कार्यक्रम यशस्वी होण्यासाठी जयश्री राठोड, राजश्री थोरात, शुभांगी पाटील, जयदादा युवा मंचचे संस्थापक जय डिगोळे, एल.एम. इंटरनॅशनल प्रीस्कूलच्या संस्थापिका ललिता कनोजिया, विभावरी शिगवन यांचे मोलाचे सहकार्य लाभले. सूत्रसंचालन कोमल डांगे यांनी केले.

तसेच मनीषा मोरे, वंदना पोपळकर, दीक्षा ढोणे, गीता कुडाळकर, वंदना वाघमोडे, करुणा कांबळे, शिल्पा म्हात्रे व संपूर्ण टीम यांच्या सहकार्यामुळे हा कार्यक्रम अत्यंत यशस्वी ठरला.

बंजारा आयुर्वेदिक हेअर ऑइलकडून हेअर ऑइल वाण स्वरूपात देण्यात आले. शुभांगी कलेक्शनकडून महिलांना आकर्षक गिफ्ट देण्यात आले. तसेच Sparkling Angels कडून महिलांना विविध ठिकाणच्या पिकनिक पॅकेजेसवर विशेष सवलती देण्यात आल्या.

## संपादकीय

# आर्थिक स्थैर्य कायम

यंदाच्या आर्थिक सर्वेक्षणातील सर्वात महत्त्वाची गोष्ट म्हणजे अशांततेसोबतच सध्याच्या जागतिक राजकीय व्यवस्थेत मोठे बदल होण्याची शक्यता दिसत असली तरी या अस्थिर परिस्थितीतही भारतीय अर्थव्यवस्था जोमाने वाटचाल करते आहे. भविष्यातील जागतिक बदलांविषयी आताच नेमकेपणाने अंदाज व्यक्त करणे आव्हानात्मक असले तरी संभाव्य बदलांना तोंड देण्यासाठी सध्या तरी भारतीय अर्थव्यवस्थेची स्थिती मजबूत दिसते आहे असा दिलासा आर्थिक सर्वेक्षणाने दिला आहे.

**संसदेचे अर्थसंकल्पीय अधिवेशन बुधवारपासून म्हणजे २८ जानेवारीपासून सुरू झाले आहे. या अधिवेशनाच्या दुसऱ्या दिवशी गुरुवारी केंद्रीय अर्थमंत्री निर्मला सीतारामन यांनी लोकसभेत आर्थिक सर्वेक्षण सादर केले. या आर्थिक सर्वेक्षणानुसार एप्रिल २०२६ मध्ये सुरू होणाऱ्या आर्थिक वर्षात भारतीय अर्थव्यवस्था ६.८ टक्के ते ७.२ टक्क्यांच्या दराने वाढणार आहे. जगभरात आर्थिक मंदी जाणवत असली तरी भारतीय अर्थव्यवस्था आपले स्थैर्य टिकवून आहे. जगातील अन्य कुठल्याही देशापेक्षा भारताचा विकास दर चांगला आहे हे आश्वासक चित्र या आर्थिक सर्वेक्षणातून दिसते आहे. मात्र हा दिलासा देतानाच या आर्थिक सर्वेक्षणाने संभाव्य जागतिक अस्थिरतेविषयी सावधगिरीचा इशाराही दिला आहे. युरोपियन युनियनशी भारताचा नुकताच ऐतिहासिक मुक्त व्यापार करार झाला. त्या पार्श्वभूमीवर हे आर्थिक सर्वेक्षण सादर केले गेले आहे. त्यामुळे संभाव्य संकटांच्या दृष्टीने आपण वेळीच सावधगिरीने नियोजनपूर्वक पावले टाकल्यास देश आपला विकासाचा वेग कायम ठेवू शकणार आहे. त्याकरिता सध्याची देशाच्या अर्थव्यवस्थेची स्थिती पूरक आहे असे या सर्वेक्षणाद्वारे सुचवण्यात आले आहे. सध्या जागतिक राजकीय व्यवस्थेत मोठ्या बदलांची शक्यता दिसते आहे. भविष्यातील घटनांबद्दल निश्चितपणे व नेमकेपणाने अंदाज बांधणे आव्हानात्मक झाले आहे. अशा परिस्थितीत देशाच्या आर्थिक वाढीसाठी हा आराखडा सादर करण्यात आल्यामुळे तो महत्त्वाचा आहे. मुख्य आर्थिक सल्लागारांच्या मार्गदर्शनाखाली अर्थ मंत्रालयाच्या आर्थिक व्यवहार विभागाने हे सर्वेक्षण तयार केले असून यात २०२५-२६ या वर्षातील सरकारची आर्थिक कामगिरी आणि प्रमुख स्थूल आर्थिक निर्देशकांचा आढावा घेण्यात आला आहे. आर्थिक सर्वेक्षणात देशाच्या गेल्या वर्षभरातील प्रगती किंवा वाढीचे कल आणि जीडीपीच्या वाढीची शक्यता, चलनवाढ आदींचे वर्णन केले जाते. यात उद्योगांसह महागाई आदी इतर आर्थिक माहितीचाही समावेश असतो. आर्थिक सर्वेक्षणातून देशाच्या आर्थिक आरोग्याचा अंदाज मिळतो. तसेच त्याखेरीज यात पुढील वर्षासाठीचा दृष्टिकोनही सादर केला जातो. त्यामुळे केंद्रीय अर्थसंकल्पाच्या आधी अपेक्षांना आकार मिळण्यात मदत होते. निर्मला सीतारामन येत्या रविवारी म्हणजे १ फेब्रुवारी रोजी यंदाचा केंद्रीय अर्थसंकल्प सादर करणार आहेत. सध्या देशाच्या सेवा क्षेत्राचा एकूण जीडीपीमधील वाटा अंदाजे ५३.६ टक्के आहे. सॉफ्टवेअर आणि व्यावसायिक सेवांच्या निर्यातीमुळे जागतिक स्तरावर भारताचे स्थान उंचावले आहे. सर्वेक्षणानुसार सेवा क्षेत्र सर्वाधिक रोजगार क्षमता देते. सरकार आता तरुणांना कृत्रिम बुद्धिमत्तेसारख्या नवीन तंत्रज्ञानासाठी तयार करण्याच्या दृष्टीने कौशल्य कार्यक्रम राबवते आहे. यातून रोजगाराच्या चांगल्या संधी उपलब्ध होऊ शकतात. सध्याच्या जागतिक अस्थिर परिस्थितीत देशातील केंद्र सरकार, राज्य सरकारे व इतर यंत्रणांनी आर्थिक विकास कायम ठेवण्यासाठी समन्वयाने काम करणे हिताचे ठरेल. येणाऱ्या काळात जागतिक परिस्थितीत मोठे बदल न घडल्यास देशाला आपली आर्थिक वाटचाल अशीच जोमाने सुरू ठेवण्यास मदतच होईल.**

# अलिबाग तालुक्यात दिग्गजांमध्ये लढत

**खबरबात**
**प्रकाश सोनवडेकर**

रायगड जिल्हा पिरिषद व पंचायत समितींची निवडणूकी ७ फेब्रुवारी रोजी होत आहे. २७ जानेवारीला या निवडणूकीचे चित्र स्पस्ट झाले. अलिबाग तालुक्यातील जिल्हा परिषदेच्या सात जागांसाठी २१ उमेदवार रिंगणात उरले आहेत तर पंचायत समितीच्या १४ जागांसाठी ४३ उमेदवार आपले भवितव्य आजमावत आहेत. यावेळी अलिबाग तालुक्यात थळ व चेंढरे या दोन मतदारसंघातील निवडणूक वगळता अन्य पाच मतदारसंघातील निवडणूका रंगतदार होणार आहेत. जिल्हा परिषदेच्या पाच मतदारसंघांमध्ये दग्गज उमेदवरांममध्ये लढत होणार आहे. त्यामुळे या लढती चुरशीच्या होतील.

अलिबाग तालुक्यातील जिल्हा परीषदेच्या ७ जागांसाठी ५६ तर पंचायत समितीच्या १४ जागांसाठी ९६ अर्जांचा दाखल झाले होते. २२ जानेवारी रोजी उमेदवारी अर्जांची छाननी झाली. त्यात जिल्हापरिषदेच्या निवडणुकीसाठी आलेल्या अर्जपैकी एक तर पंचायत समितीच्या निवडणुकीसाठी आलेल्या अर्जपैकी १ असे दोन अर्ज छाननीत अवैध ठरले होते. १५० उमेदवारी अर्ज वैध ठरले होते. जिल्हा परिषदेच्या निवडणुकीसाठी वैध ठरलेल्या ५५ उमेदवारांपैकी ३४ जणांनी उमेदवारी अर्ज मागे घेतले. २१ उमेदवार रिंगणात आहेत. पंचायत समितीच्या निवडणुकीसाठी ९५ उमेदवारांचेअर्ज वैध ठरले होते. त्यापैक ५२ जणांनी उमेदवारी अर्ज मागे घेतले. ४३ उमेदवार रिंगणात आहेत. जिल्हा परिषदेच्या आवास व चंढरे या दोन मतदारसंघांमध्ये दुरंगी लढत होणार आहे. थळ, कवीर व चौल या मतदारसंघांमध्ये तिरंगी लढत होईल.

राष्ट्रवादी काँग्रेसचे अलिबाग तालुका अध्यक्ष अमित नाईक, शिवसेनचे अलिबाग तालुका प्रमुख अनंत गोंधळी, शिवसेना ठाकरे गटाचे जिल्हा प्रमुख सुरेंद्र म्हात्रे, भाजपा महिला आघाडी जिल्हा अध्यक्ष चित्रा पाटील, शिवसेना जिल्हा प्रमुख राजा केणी यांच्या पत्नी रसिका केणी, माजी आमदार पंडित पाटील यांचे पुत्र सुप्रभात उर्फ सवाई पटील, जिल्हा परिषदेचे माजी समाजकल्याण सभापती दिलीप भोईर, विद्यमान आमदार महेंद्र दळवी यांच्या पत्नी मानसी दळवी, आमदार महेंद्र दळवी यांची सून आदिती नाईक, काँग्रेसचे वरिष्ठ जिल्हा उपाध्यक्ष राजेंद्र ठाकूर हे प्रमुख उमेदवार आहेत.


अलिबाग तालुक्यात महाविकास आघाडी झाली आहे, परंतु युती मात्र झोलेली नाही. त्यामुळे महायुतीमधील घटक पक्ष स्वबळावर निवडणूक लढवत आहेत. अलिबाग तालुक्यात शेकाप पाच जागांवर लढत आहे. त्यांनी माविकास आघाडीतील शिवसेना उध्दव ठाकरे गट व काँग्रेस यांना प्रत्येकी एक जागा सोडली आहे. युती नझाल्यामुळे काही लढती रंगतदार होतील. अलिबाग तालुक्यात जिल्हा परिषदेच्या सात मतदारसंघांपैकी आवास व चंढरे या दोन मतदारसंघांमध्ये दुरंगी लढत होणार आहे.

आवासमध्ये महाविआघाडीचे राजेंद्र ठाकूर (काँग्रेस) व दिलीप भोईर (शिवसेना) या दाने तुल्यबळ उमेदवारांमध्ये लाढ होत आहे. ही लढत चुरशीची हाईल. चेढरे मतदारसंघात महेंद्र दळवी यांची सून व अलिबागचे माजी नगराध्य प्रशांत नाईक यांची कन्या या शिवसेनेच्या उमदेवार आहे. त्याची लढाई शेकापच्या प्रविणा घासे यांच्याशी होणार आहे. महायुती झाली नवसली तरी येथे भाजपा व राष्ट्रवादी काँग्रेस यांनी आपले उमदवार येथे उभे केले नाहीत.

थळ मतदारसंघात मानसी दळवी (शिवसेना), जान्हवी पारेख (भाजप), सानिका घरत (शेकाप) अशी तीरंगी लढत आहे. मानसी दळवी या आमदार महेंद्र दळवी यांच्या पत्नी आहेत. त्या जिल्हा परिषद सदस्य देखील होत्या. त्यांच्या विरूध्द असलेले दोन्ही उमेंदवार नवखे आहे. कावीरमध्ये अनंत गोंधळी (शिवसेना), श्रीधर भोपी (राष्ट्रवाद काँग्रेस) मोहन धुमाळ (शेकाप) यांच्यात चुरशीची लढत होईल. शहापूरमध्ये अमित नाईक (राष्ट्रवादी काँगेस), गिरीष पाटील (शिवसेना), सुप्रभात उर्फ सवाई पाटील (भाजप), अभिषेक पाटील (शेकाप) यांच्यात लढत होत आहे. येथे चौरंगी लढतीमुळे चुरस आहे. चौलमध्ये सुरेंद्र म्हात्रे (शिवसेना उबाठा), सचिन राऊळ (शिवसेना), संकेत जोशी ( भाजप) अशी तीरंगी लढत होणार आहे. आंबेपूरमध्ये रसिका केणी (शिवसेना), चित्रा पाटील (भाजप), पूजा भगत (शेकाप) स्मिता पाटील (अपक्ष) अशी चौरंगी लढत असली तरी खरी लढत रसिका केणी व चित्रा पाटील यांच्यातच होईल.

मागील काही वर्षात शेकाप फुटल्यामुळे या पक्षाची ताकद अलिबाग तालुक्यात देखील कमी झाली आहे हे वास्तव आहे. या पक्षात आता दुसऱ्या फळीतील नेते नाहीत. त्यामुळे नवख्या उमेदवारांना निवडणूकीच्या रिंगणात उतरवण्यात आले आहे. अलिबाग तालुका हा शेकापचा बालेकिल्ला आहे. शेकापला आपल्या अस्तीत्वासाठी लढावे आलगत आहे. ज्या शेकापविरूध्द सर्व पक्ष मिळून लढत असत त्याच शेकापर आता इतर पक्षांशी आघाडी करून निवडणूक लढवण्याची वेळ आली आहे. शेकाप जिल्हा परिषदेच्या पाच जागा लढवत आहे. जिल्हा परिषदेच्या पाच जागा जिंकण्याबरोबरच शेकापला अलिबाग पंचायती समितीवरील आपली सत्ता राखाण्यासाठी प्रयत्न करावे लागणार आहेत.

# महात्मा मोहनदास करमचंद गांधी



महात्मा मोहनदास करमचंद गांधी (२ ऑक्टोबर १८६९ – ३० जानेवारी १९४८) हे भारतीय स्वातंत्र्य चळवळीचे नेते होते. त्यांना भारतात राष्ट्रपिता म्हणून ओळखले जाते. गांधीजींचा जन्म पोरबंदर येथे २ ऑक्टोबर १८६९ रोजी झाला. त्यांचे वडील करमचंद गांधी हे पोरबंदर संस्थानाचे दिवाण होते. त्यांच्या आईचं नाव पुतळीबाई होतं, जी धार्मिक आणि सद्गुणी महिला होती. त्यांच्या बालपणातच त्यांच्यावर धार्मिकतेचा आणि नैतिकतेचा प्रभाव पडला. १८८८मध्ये गांधीजी इंग्लंडला गेले आणि तिथे कायद्याचे शिक्षण घेतले. १८९१ मध्ये ते वकिलीची पदवी घेऊन भारतात परतले, परंतु भारतात त्यांना विशेष यश मिळाले नाही.

१८९३ साली एका कायदेशीर प्रकरणासाठी ते दक्षिण आफ्रिकेत गेले. तिथे त्यांनी भारतीय लोकांवरील वर्णद्वेषाचा अनुभव घेतला, ज्यामुळे ते राजकीय आणि सामाजिक कार्यात सक्रिय झाले. त्यांनी तिथे सत्याग्रहाची संकल्पना राबवली, जी पुढे भारतीय स्वातंत्र्य चळवळीत महत्त्वाची ठरली. गांधीजींचे सत्याग्रहाचे तत्वज्ञान म्हणजे सत्याच्या मार्गाने आणि अहिंसेच्या आधारे अन्यायाचा प्रतिकार करणे. त्यांनी समाजातील विषमतेविरुद्ध आणि ब्रिटीश राजवटीविरुद्ध सत्याग्रहाचे हत्यार वापरले. अहिंसेच्या माध्यमातून त्यांनी समाजातील विविध घटकांना एकत्र आणून सामाजिक एकता निर्माण केली. गांधीजींनी ग्रामस्वराज्याची संकल्पना मांडली, ज्यामध्ये ग्रामीण विकासाला प्राधान्य दिले. त्यांनी खादीचा प्रसार केला आणि स्वदेशी वस्तूंचा वापर करण्यावर भर दिला. त्यांच्या मते, भारतीय समाजाची खरी ताकद ग्रामीण भागात आहे आणि स्वावलंबन हेच आत्मनिर्भर भारताचे मुख्य साधन आहे.

त्यांनी स्त्रियांना स्वातंत्र्य चळवळीत भाग घेण्याचे आवाहन केले. त्यांनी बालविवाह, पर्दा प्रथा आणि स्त्रियांचे शोषण या समस्यांवर आवाज उठवला.भारत हा विविध धर्मांचा आणि जातांचा देश आहे. महात्मा गांधींनी धर्मांमध्ये शांतता आणि जातीय सलोख्याचे महत्त्व पटवून दिले. त्यांनी हिंदू-मुस्लिम ऐक्याचे समर्थन केले आणि सर्वधर्मसमभावाचे तत्वज्ञान मांडले. ३० जानेवारी १९४८ रोजी महात्मा गांधींची हत्या करण्यात आली.

साभार : इंटरनेट



## बदलते तंत्रज्ञान

# व्हॉट्सअॅप युजर्ससाठी लाँच होणार खास फीचर

लॉकडाउनच्या काळात व्हिडीओ कॉलिंग अॅप्सचा वापर मोठ्या प्रमाणात वाढला. व्हिडीओ कॉन्फरन्सिंग अॅप गूगल मीट, झूम यांच्या मदतीने घरबसल्या काही कामे सोपी होऊ लागली. मोबाइलचा स्क्रीन शेअर करून प्रेझेंटेशन, व्हिडीओ कॉन्फरन्सिंग, मीटिंग, मुलाखत, विद्यार्थ्यांना शिकवणे आदी बऱ्याच गोष्टी या अॅप्सद्वारे शक्य होऊ लागल्या. आता गूगल मीट, झूमप्रमाणेच व्हॉट्सअॅपसुद्धा त्यांच्या वापरकर्त्यांसाठी एक खास फीचर घेऊन येत आहे.



'मेटा'च्या मालकीच्या इन्स्टंट मेसेजिंग अॅप व्हॉट्सअॅपने २०२३मध्ये स्क्रीन शेअर फीचर लाँच केले होते, पण हे फीचर सर्व वापरकर्त्यांसाठी उपलब्ध नव्हते. आता अॅण्ड्रॉइड आणि आयओएस, आयफोन वापरकर्ते या फीचरचा उपयोग करू शकणार आहेत. व्हॉट्सप व्हिडीओ कॉलमध्ये स्क्रीन शेअरिंग फीचर जोडत आहेत. या फीचरच्या माध्यमातून व्हिडीओ कॉलिंग करताना मोबाइलचा स्क्रीन शेअर करता येईल. या माध्यमातून एक युजर आपल्या मोबाईलमधील कन्टेन्ट दुसऱ्या युजर्सला दाखवू शकेल आणि काही अडचण असल्यास तिथे परस्पर संवाद साधू सांगू शकेल. स्क्रीन शेअर करताना अॅप्स स्विच करणेसुद्धा शक्य होईल.

**व्हॉट्सअॅपवर स्क्रीन शेअरिंग फीचर कसे वापरावे?**

व्हॉट्सअॅपवर व्हिडीओ कॉल सुरू करा. डिस्प्लेच्या तळाशी असलेल्या स्क्रीन शेअरिंग आयकॉनवर टॅप करा. तुम्हाला तुमची स्क्रीन शेअर करायची आहे याची खात्री करा. आता तुमच्या मोबाईलची स्क्रीन व्हिडीओ कॉलमध्ये उपस्थित सर्व वापरकर्त्यांना दिसेल. नंतर जर तुम्हाला स्क्रीन शेअर करणे थांबवायचे असल्यास स्टॉप शेअरिंग या पर्यायावर टॅप करा.

**व्हॉट्सअॅप विंडोजवर स्क्रीन कशी शेअर करावी?**

व्हॉट्सअॅप वापरकर्त्यांना डेस्कटॉपवरसुद्धा संपूर्ण स्क्रीन शेअर करण्याची परवानगी देते. डेस्कटॉप अॅपवर व्हिडीओ कॉल सुरू करा. स्क्रीनवरील शेअर आयकॉनवर क्लिक करा. स्क्रीन शेअरिंग हा पर्याय निवडा तसेच नंतर तुम्हाला स्क्रीन शेअरिंग थांबवायची असेल, तर तुम्ही थांबवू शकता. अशा सोप्या पद्धतीने तुम्ही लवकरच व्हॉट्सअॅपवर स्क्रीन शेअरिंग हे फीचर वापरू शकणार आहात.

# गायक, व्हायोलिनवादक पं. गजाननबुवा जोशी



## निमित्त

गायक, व्हायोलिनवादक व गुरू म्हणून सुविख्यात असणाऱ्या पं. गजाननराव अनंत जोशी यांचा जन्म मुंबईतील गिरगाव येथे ३० जानेवारी १९११ झाला. त्यांच्या आईचे नाव इंदिराबाई होते. त्यांचे घरगुती नाव 'राम' असे होते. पं. गजाननबुवांच्या घराण्यात संगीताची परंपरा होती. गजाननबुवांचे आजोबा मनोहरपंत हे सुमारे १८५०-१८७० या काळातील गायक होते. त्यांनी इचलकरंजीच्या रावजीबुवा गोगटे यांच्याकडे तालीम घेतली होती, तर वडील अनंत मनोहर जोशी तथा अंतूबुवा हे ग्वाल्हेर घराण्याचे उत्तम गायक म्हणून विख्यात होते.

वडील अंतूबुवा हेच गजाननबुवांचे पहिले गुरू होते. गिरगावात अंतूबुवांचे श्रीसमर्थ गायन वादन विद्यालय होते. त्यामुळे गजाननबुवांवर बालवयातच संगीताचे संस्कार झाले. अंतूबुवांच्या पत्नी व मुलांचे पाठोपाठ आकस्मिक निधन झाल्याने ते विद्यालय बंद करून प्रथम सांगलीस आले व नंतर त्यांची नेमणूक औंध संस्थानात दरबार गायक म्हणून झाली. वडिलांकडून गजाननबुवांना पारंपरिक पद्धतीने गायनाची तालीम मिळाली. शिवाय तबला, हार्मोनिअम ही वाद्येही सरावाची झाली. लहानपणी ते जलतरंग हे वाद्य अत्यंत तयारीने वाजवीत.

दहा वर्षांच्या छोट्या गजाननाचा जलतरंगवादनाचा पहिला कार्यक्रम औंधमध्ये भवानराव पंतप्रतिनिधींनी आयोजित केला व ते वादन संपूर्ण संस्थानामध्ये कौतुक व कुतूहलाचा विषय होता. औंधचे राजे पंतप्रतिनिधी यांनी स्वतःच्या कीर्तनाच्या साथीसाठी गजाननास हे वाद्य वाजवण्याची आज्ञा केली. वयाच्या तेराव्या-चौदाव्या वर्षी १९२३च्या आसपास गजाननाने व्हायोलिन हे वाद्य हाती घेतले व स्वतःच्या एकलव्य परिश्रमाने साध्य केले. गजाननबुवांनी रूढ अर्थाने कोणाकडेही व्हायोलिनवादनाचे शिक्षण घेतले नव्हते. त्या काळात हिंदुस्थानी संगीतात या वाद्याचा प्रसार विशेष झाला नव्हता व हे वाद्य अल्पपरिचित होते. या वाद्यावर उत्तर हिंदुस्थानी रागसंगीताचा आविष्कार करणाऱ्या कलाकारांच्या पहिल्या पिढीतील गजाननबुवा जोशी हे एक अग्रश्रेणीचे कलाकार म्हणून नावाजले गेले. त्यांचे १९२८पासून मुंबई रेडिओवर कार्यक्रम होऊ लागले. प्रभात फिल्म कंपनीच्या 'अयोध्येचा राजा' या पहिल्या बोलपटाच्या वाद्यवृंदात ते १९३०मध्ये सहभागी होते.

तत्कालीन महाराष्ट्रात व्हायोलिन म्हणजे पं. गजाननराव जोशी असे समीकरण सिद्ध करणाऱ्या बुवांनी वादनाची एक स्वतंत्र शैली निर्माण केली. या पाश्चात्त्य वाद्यावर भारतीय रागसंगीताच्या प्रस्तुतीचे तंत्र व ढाचा त्यांनी तयार केला. व्हायोलिनसाठी त्यांनी खास अशा अनेक गतींच्या रचनाही केल्या. 'भारताचा यहुदी मेनुइन' म्हणून गजाननबुवांचा गौरव करण्यात आला.

आवाजाची फारशी अनुकूलता नसतानादेखील लयकारी व रागदारीवर प्रभुत्व स्थापित करून अतिशय मेहनतीने त्यांनी आपले स्थान निर्माण केले. ग्वाल्हेर, जयपूर आणि आग्रा या तीन घराण्यांचा रंग असणारा भारदस्त गायक अशी त्यांची ओळख होती व या गुणग्राही कलाकाराबद्दल सर्वत्र आदर होता.

गजाननरावांचा विवाह दुर्गाबाई यांच्याशी झाला (१९३३). गजाननबुवांचे २८ जून १९८७ रोजी डोंबिवली येथे निधन झाले.

**(साभार : इंटरनेट)**


## चित्र रंगवा



## आरोग्य प्रहर

# कोलेस्ट्रॉल, मधुमेह, बद्धकोष्ठतेवर पेरू उपयोगी

निरोगी आयुष्यासाठी हृदय निरोगी ठेवणे आवश्यक आहे. आणि त्यासाठी तुमचे रक्तदाब आणि कोलेस्ट्रॉलची पातळी नियंत्रित करणे महत्त्वाचे आहे. खाण्यापिण्याच्या चुकीच्या सवयी, बैठी जीवनशैली आणि व्यायामाचा अभाव यामुळे कोलेस्ट्रॉलची पातळी वाढते. चुकीच्या जीवनशैलीचा आरोग्यावर विपरीत परिणाम होत असतो. खराब कोलेस्ट्रॉलमुळे हृदयविकाराचा धोका वाढतो. त्यासह इतर अवयवांचे देखील नुकसान होते.



हाय कोलेस्ट्रॉल आणि हाय ब्लड शुगर लेव्हलमुळे गंभीर समस्या उद्भवतात. त्याचप्रमाणे बद्धकोष्ठता हा त्रास बहुतेक सर्व वयोगटांतल्या लोकांना होताना दिसून येतो. मधुमेहदेखील अनेकांना असतो. कोलेस्ट्रॉल कमी करण्यासाठी, मधुमेह नियंत्रित करण्यासाठी व बद्धकोष्ठता दूर करण्यासाठी कोणते फळ तुमच्यासाठी फायदेशीर ठरू शकते याविषयी फरिदाबादच्या एशियन हॉस्पिटलच्या प्रमुख आहारतज्ज्ञ कोमल मलिक यांनी माहिती दिली आहे. त्यासंबंधी सविस्तर माहिती जाणून घेऊ...

आहारतज्ज्ञ सांगतात, सध्या थंडीचा हंगाम आहे. पेरूची मोठ्या प्रमाणात विक्री होत असते. पेरू हिवाळ्यातच नाही, तर प्रत्येक ऋतूत आवडीनं खाल्ला जातो. पेरू खाण्याचे अनेक फायदे आहेत. अशा परिस्थितीत कोलेस्ट्रॉलची पातळी कमी करण्यासाठी पेरूचे सेवन केले पाहिजे. पेरूमध्ये सॉल्युबल फायबरचे प्रमाण जास्त प्रमाणात असते, जे तुमच्या रक्तातील खराब कोलेस्ट्रॉलचे प्रमाण कमी करते तसेच तुमच्या शरीरातील अतिरिक्त जमा झालेली चरबीदेखील नष्ट करण्यास मदत करते. पेरू खाल्ल्यामुळे तुमच्या हृदयाचे कार्यही सामान्य राहते. आपले चांगले कोलेस्ट्रॉल वाढण्यास आणि खराब कोलेस्ट्रॉल कमी होण्यास मदत मिळते.

तज्ज्ञांच्या मते, पेरू खाल्ल्याने मधुमेहावर नियंत्रण मिळवले जाऊ शकते. मधुमेह एक अशी समस्या आहे, ज्यात रक्तामध्ये साखरेचा स्तर नियंत्रित राहत नाही. ही समस्या शरीरात निर्माण होणाऱ्या इन्सुलिनला अडथळा निर्माण होण्याने उदभवते. पेरूमध्ये कमी ग्लायसेमिक इंडेक्स म्हणजेच जीआय असतो, ज्यामुळे साखर नियंत्रित राहते. फायबर असते. ते रक्तातील साखरेच्या वाढीस प्रतिबंध करते.

पेरूमध्ये फायबर असते, ज्यामुळे बद्धकोष्ठता दूर होऊन, पचन चांगले होते. त्यासोबतच पचनक्रियाही निरोगी राहते. पोटाचे अनेक आजार दूर करण्यासाठी हा रामबाण उपाय आहे.

# ‘देश विघातक शक्तींना रोखण्यासाठी भारतीयांनी एकत्रित होण्याची गरज’

**खोपोली : प्रतिनिधी**

देशअंतर्गत विघातक शक्तींना रोखण्यासाठी समस्त भारतीयांनी एकत्र येण्याची काळाची गरज असल्याचे प्रतिपादन भाजप शहर अध्यक्ष अजय इंगुलकर यांनी केले.

७० व्या प्रजासत्ताक दिनानिमित्त भारत माता पूजन कार्यक्रम दीपक हॉटेल चौकात रास्व संघ खालापूर तालुका यांच्यावतीने आयोजित करण्यात आला होता यावेळी प्रमुख अतिथी म्हणून इंदुलकर बोलत होते यावेळी नवनिर्वाचित नगरसेवक राहुल गायकवाड व रा स्व संघाचे कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.



भारताच्या सीमेवर आपले सैनिक जागता पहारा देतच आहेत, मात्र देशांतर्गत मोठ्या प्रमाणात घातक शक्ती निर्माण होत आहे, त्यासाठी प्रत्येकाने जागृत राहण्याची गरज आहे. आजच्या दिनी देशाला स्वातंत्र्य मिळवण्यासाठी ज्यांनी ज्यांनी बलिदान दिले त्यांचे स्मरण झालेच पाहिजे.

१९५० साली डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर यांच्या अध्यक्षतेखाली समितीने संविधान लिहिले त्याची अंमलबजावणी २६ जानेवारी १९५० करण्यात आली त्यानंतर कायदा अमलात आला व त्या संविधानानुसारच देशाचा कारभार सुरू आहे अशा संविधानाचा सन्मान प्रत्येकाने केला पाहिजे व देशाची एकता अखंडता कायम राहावी यासाठी प्रत्येक भारतीयाने प्रयत्न केले पाहिजे असे सांगितले पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखाली देश विकासाच्या वाटेवर आहे यासाठी त्यांचे हात बळकट करण्यासाठी भारतीयांनी एकत्रित राहण्याची गरज असल्याचे पण त्यांनी सांगितले.

यावेळी नवनिर्वाचित नगरसेवक राहुल गायकवाड यांनी आपले विचार प्रकट केले. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन सुधाकर भट यांनी केले यावेळी संघाचे कार्यकर्ते व नागरिक उपस्थित होते.

# मंगेश काळोखे यांच्या गुन्ह्याची सर्वंकष चौकशी करावी –महेंद्र थोरवे

**कर्जत : प्रतिनिधी**

खोपोली येथील शिवसैनिक मंगेश काळोखे यांची हत्या सुपारी देऊन करण्यात आली होती आणि त्याबाबत अनेक वेगळे विषय आमच्याकडे आहेत. त्या सर्व विषयांचे तपास पोलिसांनी करावा. या गुन्ह्यातील प्लॅनरला अटक करावी. या हत्येसाठी २० लाखांची नाहीतर एक कोटीची सुपारी दिली होती. असा गौप्यस्फोट महेंद्र थोरवे यांनी पत्रकार परिषदेच्या माध्यमातून केला.



कर्जत मधील बाळासाहेब भवन येथे पत्रकार परिषदेचे आयोजन करण्यात आले होते. याप्रसंगी काळोखे कुटुंबातील सर्व सदस्य उपस्थित होते. याप्रसंगी आमदार थोरवे यांनी, ’खोपोली येथे ही घटना घडली त्याच्या आदल्या रात्री रवी देवकर यांच्या कार्यालयात झोपवण्यात आले होते आणि ठरल्याप्रमाणे मोहन काळोखे यांची हत्या करण्यासाठी जाणार होते. त्यावेळी २० लाख रुपये हे टोकन म्हणून दिले होते.

एवढी मोठी रक्कम रवी देवकर देऊ शकत नाही आणि म्हणूनच भरत भगत, सुधाकर घारे यांची नावे देण्यात आली होती. भरत भगत यांचे १२ कॉल झाले होते. त्याला अटक असून जेल मध्ये पाठवले आहे. सुधाकर घारे यांना अद्याप अटक करण्यात आली नाही आणि न्यायालयाचे पोलिसांना अटक करून त्यांची चौकशी करावी असे आदेश आहेत.

’खोपोली पोलिस अधिकारी उद्धटपणे वागत असून पोलिस सहनभूतीची भूमिका दाखवत आहेत. त्यांच्याबाबत आपण वरिष्ठांनी लक्ष घालावे. अशी मागणी करणार आहे. २३ डिसेंबर रोजी कॉल होत असून तीन दिवसांनंतर हत्या होते हे लक्षात घेता सुधाकर घारे यांचा सहभाग असेल असे दिसून येत आहे. घारे हे ही घटना घडत असताना गुजरात राज्यात पोहचले ही घटना घडत असताना आपण बाहेर आहे हे दाखवण्याचा त्याचा प्रयत्न आहे काय? मंगेश काळोखे यांच्या घराच्या बाजूला राहणारे दोन कुटुंब हत्या होण्याच्या आधी पासून फरार आहेत. त्या कुटुंबाचा शोध देखील पोलिसांनी अद्याप केलेला नाही. या गुन्ह्याच्या तपासात स्पेशल सरकारी वकील नेमण्यात यावा. अशी आम्ही मागणी केली आहे.

# खालापुरात महायुती उमेदवारांच्या प्रचारासाठी मंत्री भरत गोगावले

**खोपोली : प्रतिनिधी**

भारतीय जनता पक्ष, शिवसेना, रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया या महायुतीच्या उमेदवारांच्या प्रचारासाठी मंत्री भरत गोगावले यांनी खालापूर तालुक्यातील आकरगाव जिल्हा परिषद प्रभागात धावता दौरा करून कार्यकर्त्यांचा उत्साह वाढविला. त्यांच्या आगमनाने कार्यकर्त्यांमध्ये मोठ्या प्रमाणात उत्साह संचारला.



आतकरगाव वार्डात जिल्हा परिषदेसाठी रेश्मा पाटील तर पंचायत समिती गणात रोहिणी एरम व भाई शिंदे हे पॅनल मध्ये निवडणूक लढवीत आहेत. रेश्मा पाटील या भाजपचे ज्येष्ठ नेते व जिल्हा परिषद माजी सभापती नरेश पाटील यांच्या सुनबाई आहेत तर रोहिणी एरम या ज्येष्ठ नेते लक्ष्मणबुवा एरम यांच्या सुनबाई आहेत तर भाई शिंदे हे शिवसेनेचे जिल्हा परिषदेचे माजी उपाध्यक्ष आहेत. भरत गोगावले यांनी यावेळी बोलताना माझे मित्र नरेश पाटील यांच्या प्रेमापोटी त्याचप्रमाणे आमच्या महायुतीच्या उमेदवारांना विजयी करण्याचे मतदारांना आवाहन करण्यासाठी खालापूरात आल्याचे त्यांनी सांगताना महायुतीचे सर्व उमेदवार चांगल्या मताधिक्काने निवडून येतील असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

# कर्जतमधील उकरूल येथे भाजप उमेदवारांच्या प्रचाराचा शुभारंभ

**कर्जत : प्रतिनिधी**

भाजपच्या उमेदवार राधिका किशोर ठाकरे यांच्या निवडणूक प्रचाराचा शुभारंभ उकरूल येथील श्री साईबाबा मंदिरात करण्यात आला.

माणगाव तर्फे वरेडी जिल्हा परिषद गटाच्या उमेदवार राधिका ठाकरे यांच्या प्रचाराचा शुभारंभ उकरूल येथे करण्यात आला. या वेळी तसेच भाजप ओबीसी मोर्चाचे विजय हजारे, किशोर ठाकरे, भाजप माजी तालुका चिटणीस संजय कराळे, मिनेश मसने, सरचिटणीस सचिन म्हसकर, प्रल्हाद राणे, दर्शन कांबरी, रोशन पाटील, धनंजय थोरवे. रोशन पाटील, राजकुमार धुळे, धनंजय थोरवे, अनिकेत सावंत आणि शेकडो कार्यकर्ते बहुसंख्येने उपस्थित होते. त्यावेळी कार्यकर्त्यांची मोठी गर्दी झाल्याने भाजप मध्ये उत्साहाचे वातावरण दिसून येत आहे. त्यानंतर भाजपच्या माणगाव तर्फे वरेडी गटाच्या उमेदवार राधिका ठाकरे यांनी चिंचवली ग्रामपंचायतमध्ये प्रचाराची फेरी काढली.



माणगाव जिल्हा परिषद गटामध्ये भारतीय जनता पक्ष दोन जागा लढवत आहे. भाजपच्या कमळ या निवडणूक चिन्हाबद्दल मतदारांमध्ये प्रचंड उत्सुकता असल्याने कार्यकर्त्यांमध्ये पहिल्याच प्रचार फेरी मध्ये जोरदार उत्साह दिसून आला. कार्यकर्त्यांनी कर्जत तालुक्यातून रायगड जिल्हा परिषदमध्ये कमळ निवडणूक चिन्हावर उमेदवार निवडून जाणारं असा मतदारांचा पाठिंबा पाहून वाटत आहे. आगामी काळात भाजपचे कार्यकर्त्यांना अधिक ताकद देण्यासाठी कार्यकर्ते अधिक क्षमतेने निवडणूक काळात माणगाव तर्फे वरेडी जिल्हा परिषद गटातील प्रत्येक गावात आणि वाडी वस्तीत घरोघरी जाऊन प्रचार करतील असा विश्वास पदाधिकारी व कार्यकर्त्यांनी व्यक्त केला.

यासोबतच कर्जत तालुक्यातील माणगाव तर्फे वरेडी गटामध्ये भारतीय जनता पक्ष चमत्कार घडवणार असल्याचा विश्वासही पदाधिकारी व कार्यकर्त्यांनी उकरूल येथे झालेल्या निवडणूक प्रचाराच्या शुभारंभावेळी केला.

# उपमुख्यमंत्री अजितदादांच्या निधनामुळे श्रीवर्धनमध्ये व्यापाऱ्यांचा उत्स्फूर्त बंद

**श्रीवर्धन : वार्ताहर**

महाराष्ट्राचे उपमुख्यमंत्री अजितदादा पवार यांचे काल विमान अपघातात निधन झाले. या घटनेची बातमी सर्वत्र पसरताच सर्वत्र हळहळ व्यक्त केली गेली. श्रीवर्धन मतदारसंघ हा राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवार गटाचा बालेकिल्ला मानला जातो. या ठिकाणची श्रीवर्धन नगरपरिषदेत देखील यावेळी राष्ट्रवादी काँग्रेसचे सर्वात जास्त १५ नगरसेवक निवडून आले आहेत. तर रायगड लोकसभेचे खासदार देखील स्वतः सुनील तटकरे आहेत.



उपमुख्यमंत्री अजितदादा पवार यांच्या अपघाती निधनानंतर आज श्रीवर्धन मधील सर्व व्यापाऱ्यांनी पूर्णपणे उत्स्फूर्त बंद पाळला. श्रीवर्धन मधील बाजारपेठ पूर्णपणे बंद होती. मात्र काही शैक्षणिक संस्था अंशतः सुरू असल्याचे पाहायला मिळाले. श्रीवर्धन बाजारपेठेत फक्त औषधाची दुकाने चालू होती. बाकी सर्व व्यवहार बंद होते. काल सायंकाळी श्रीवर्धन येथील छत्रपती शिवाजी महाराज चौकामध्ये अजित पवार यांना भावपुर्ण श्रद्धांजली वाहण्यात आली.

# महाड येथे आजपासून कृषिधन : कृषी विज्ञान-हवामान-तंत्रज्ञान प्रदर्शन

**माणगाव : प्रतिनिधी**

महाड येथील श्री विरेश्वर देवस्थान परिसरात दि. ३० व ३१ जानेवारी रोजी कृषिधन : कृषी विज्ञान – हवामान –तंत्रज्ञान प्रदर्शन २०२६ या महत्त्वपूर्ण प्रदर्शनीचे आयोजन करण्यात आले आहे. कृषी, विज्ञान, हवामान व आधुनिक तंत्रज्ञान यांचा संगम साधणारे हे प्रदर्शन शेतकरी, विद्यार्थी, शिक्षक, संशोधक व कृषी उद्योग क्षेत्रासाठी मार्गदर्शक ठरणार आहे.

या प्रदर्शनात कृषी तज्ज्ञ, शास्त्रज्ञ, विद्यार्थी, विज्ञान शिक्षक, फार्मर प्रोड्युसर कंपनीचे उद्योग प्रतिनिधी एकत्र येणार असून, नवीन कृषी तंत्रज्ञान, आधुनिक शेती पद्धती, हवामान बदलाचे शेतीवरील परिणाम, कृषी उद्योगातील बदलत्या संधी, तसेच कृषी विकासात हवामान अंदाजाचे महत्त्व या विषयांवर परिसंवाद व सखोल चर्चा होणार आहेत. यासोबतच महाडमध्ये उपलब्ध कृषी संलग्न अभ्यासक्रम, उच्च शिक्षण व करिअर संधी यावर विशेष परिसंवादाचे आयोजन करण्यात आले आहे.

डॉ. बाळासाहेब सावंत कोकण कृषी विद्यापीठ, दापोली संलग्न कॉलेज ऑफ अ‍ॅग्रीकल्चर, अ‍ॅग्रीकल्चरल बायोटेक्नॉलॉजी व फूड टेक्नॉलॉजी, महाड येथील विद्यार्थ्यांकडून विविध विषयांवरील मॉडेल्स सादर करण्यात येणार आहेत. यामध्ये कृषी पर्यटन, मातीविना शेती, उभी शेती, सेंद्रिय शेती, एकात्म शेती पद्धती, सौर ऊर्जा सिंचन, हरितगृह, पर्जन्यजल साठवण, कंपोस्ट व गांडूळ खत, अन्न कचरा व्यवस्थापन, अन्न पॅकेजिंग, द्राक्ष वाईन उत्पादन, मानवी व वनस्पती पेशी, न्यूरॉन, क्लोरोप्लास्ट, कोरोना विषाणू, आरोग्य व स्वच्छता आदी विषयांचा समावेश असणार आहे.

प्रदर्शनादरम्यान कृषी महाविद्यालय फार्ममधील ताजा भाजीपाला, कंपोस्ट खत, पशुखाद्य विक्रीसाठी उपलब्ध राहणार आहे. यावेळी फार्म फ्रेश व्हेजी बॅग चे लोकार्पण होणार असून, ही भाजीपाला बॅग दर आठवड्याला महाडकरांसाठी उपलब्ध करून देण्यात येणार आहे.

प्रदर्शनीच्या परिसरास डॉ. बाळासाहेब सावंत विज्ञान नगरी असे नाव देण्यात आले असून,शालेय शिक्षण अधिक अनुभवाधिष्ठित व्हावे, अन्न उत्पादन, पर्यावरणशास्त्र, जैवविविधता व संवर्धन यांचे महत्त्व प्रत्यक्ष पाहता यावे, यासाठी कृषिधन : कृषी विज्ञान – हवामान – तंत्रज्ञान प्रदर्शन २०२६ निश्चितच उपयुक्त ठरेल, असा विश्वास प्राचार्य डॉ. वैभव गिम्हवणेकर यांनी व्यक्त केला आहे.

शालेय व महाविद्यालयीन विद्यार्थी, विज्ञान शिक्षक, शेतकरी गट, बचत गट, कृषी पत्रकारिता अभ्यासक्रमाचे विद्यार्थी, एफपीओ संचालक व जागरूक नागरिकांनी या प्रदर्शनीला अवश्य भेट द्यावी, असे आवाहन आयोजकांकडून करण्यात आले आहे.

विद्यार्थी–शास्त्रज्ञ संवाद कार्यक्रमात डॉ. विद्याधर वैद्य (कृषी हवामान शास्त्र विभाग, आनंद कृषी विद्यापीठ, गुजरात) तसेच अनुभवकुशल औद्योगिक व्यवस्थापक व समाजाभीमुख रोटेरिअन सुरेश भोसले यांची प्रेरणादायी उपस्थिती लाभणार आहे. तर प्रदर्शनीचे उद्घाटन डॉ. बाळासाहेब सावंत कोकण कृषी विद्यापीठ, दापोलीचे कुलगुरु डॉ. संजय भावे, कुलसचिव डॉ.संतोष सावर्डेकर यांच्या हस्ते होणार आहे. कार्यक्रमाचे अध्यक्ष प्राचार्य डॉ. वैभव गिम्हवणेकर हे असतील.

# डॉ.सी.डी.देशमुख यांच्या जयंतीनिमित्त रोहा येथे विज्ञान प्रदर्शन उत्साहात

**रोहा : प्रतिनिधी**

दिपक नायट्राईट कंपनी, धाटाव व दिपक फाउंडेशन (प्रकल्प यंग सायंटिस्ट– $STEM^{2}$) तसेच रोटरी क्लब ऑफ रोहा सेंट्रल यांच्या संयुक्त विद्यमाने नगर परिषद शाळा क्र. १०, रोहा येथे डॉ. सी. डी. देशमुख यांच्या जयंतीनिमित्त दि. २४ जानेवारी रोजी विज्ञान प्रदर्शनाचे आयोजन करण्यात आले होते.



या विज्ञान प्रदर्शनात नगर परिषद शाळा क्र. १, ९ व १०, डॉ. सी. डी. देशमुख माध्यमिक विद्यालय तसेच जिल्हा परिषद प्राथमिक शाळा तळाघर, खैरे खुर्द, महादेववाडी आणि सानेगाव आश्रम शाळा – अशा एकूण आठ शाळांमधील ५४ विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदविला. विद्यार्थ्यांनी ३४ विज्ञान मॉडेल्स तयार करून त्यांचे उत्कृष्ट सादरीकरण केले. विविध प्रयोग, नवकल्पना व तांत्रिक मॉडेल्समधून विद्यार्थ्यांची सर्जनशीलता आणि वैज्ञानिक दृष्टिकोन ठळकपणे दिसून आला.

विद्यार्थ्यांमध्ये विज्ञान, तंत्रज्ञान, अभियांत्रिकी व गणित विषयांबाबत जिज्ञासा, प्रयोगशीलता, सर्जनशीलता व वैज्ञानिक दृष्टिकोन विकसित करणे, हा या उपक्रमाचा मुख्य उद्देश असल्याचे आयोजकांनी सांगितले.या कार्यक्रमासाठी प्रमुख अतिथी म्हणून रोहा अष्टमी नगर परिषदेच्या नगराध्यक्षा कु. वनश्री शेडगे उपनगराध्यक्ष अहमद दर्जी, सभापती मयूर दिवेकर व महेश कोल्हटकर , नगरसेविका पूर्वा मोहिते, सुप्रिया जाधव, संजना शिंदे, नगरसेवक अजित मोरे, प्रशांत कडू, दिवेश जैन, माझ सवाल आणि अरबाजमणेर उपस्थित होते

तसेच रोटरी क्लब ऑफ रोहा सेंट्रलचे अध्यक्ष विजय दिवकर, सचिव राकेश कागडा, खजिनदार दिलीप देशमुख, पर्यवेक्षक गणेश गर्जे, दिपक नायट्राईट कंपनी धाटाव शाखेचे एच.आर. हेड श्री. सदानंद महागावकर, अ‍ॅडमिन हेड प्रशांत पोरे व साइट हेड राजेश गाजरे यांची प्रमुख उपस्थिती होती.

दिपक फाउंडेशनच्या वतीने प्रकल्प समन्वयक प्रीती कापसे, विषय शिक्षिका तृणाली पाटील, प्राजक्ता धूमाळ व प्राची शिर्के, समुपदेशक ओजस्विनी महाडीक, फील्ड पर्यवेक्षक मृणाली मरवडे, अकाउंट अ‍ॅडमिन मल्लेश हंचली, वाहन चालक अमोल जाधव तसेच सर्व सहभागी शाळांचे शिक्षकवृंद पालकवर्ग आणि उपस्थित होते.

# डॉ.धनंजय जाधव पुरस्काराने सन्मानित

**कर्जत : प्रतिनिधी**

रायगड जिल्ह्यात राष्ट्रीय मतदार दिनी गौरव निवडणूक कामातील योगदानाची दखल घेत कर्जत तहसीलदार डॉ. धनंजय जाधव यांना रायगड जिल्हाधिकाऱ्यांच्या हस्ते राष्ट्रीय मतदार दिनी गौरविण्यात आले. निवडणूक आयोगाच्या मार्गदर्शक सूचनेनुसार ’राष्ट्रीय मतदार दिन’ उत्साहात साजरा करण्यात आला. या निमित्ताने रायगड जिल्हा प्रशासनाच्या वतीने आयोजित विशेष सोहळ्यात कर्जत तहसीलदार डॉ. धनंजय जाधव यांना ’उत्कृष्ट साहाय्यक मतदार नोंदणी अधिकारी पुरस्कार २०२६’ देऊन सन्मानित करण्यात आले.

रायगड जिल्हाधिकारी तथा जिल्हा निवडणूक अधिकारी किशन जावळे यांच्या हस्ते हा मानाचा पुरस्कार प्रदान करण्यात आला. सन्मानपत्र आणि स्मृतीचिन्ह असे या पुरस्काराचे स्वरूप होते. सन २०२५ या वर्षभरात मतदार यादीचे अद्ययावतीकरण, मतदारांच्या तक्रारींचे जलद निवारण आणि निवडणूक प्रक्रियेत राबविलेले विविध नाविन्यपूर्ण उपक्रमांसाठी. तहसीलदार जाधव यांची निवड करण्यात आली. विशेषत युवा मतदारांची नोंदणी वाढवण्यासाठी आणि पारदर्शक निवडणूक प्रक्रियेसाठी त्यांनी केलेल्या प्रयत्नांची दखल जिल्हा प्रशासनाने घेतली आहे.

लोकशाही बळकट करण्यासाठी अचूक मतदार यादी हा कणा आहे.डॉ धनंजय जाधव यांच्यासारख्या कर्तव्यदक्ष अधिकाऱ्यांमुळे निवडणूक कामात अचूकता आणि गती येते. त्यांचे कार्य इतर अधिकारी आणि कर्मचाऱ्यांसाठी प्रेरणादायी आहे. या पुरस्काराबद्दल तहसीलदार धनंजय जाधव यांचे सर्व स्तरांतून अभिनंदन होत आहे.


## जाहीर नोटीस

तमाम जनतेस या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की, आमचे अशिलांनी खालीलप्रमाणे वर्णन केलेली मिळकत जमीन मालक **श्री. सिताराम हाल्या शिंदे** रा. मोहो, पो. चिखले, ता. पनवेल, जि. रायगड यांजकडून सदर मिळकत विकत घेण्याच्या विचारात आहेत.

**मिळकतीचे वर्णन**
**मौजे – मोहो, ता. पनवेल, जि. रायगड**

| स.नं. | हि.नं. | क्षेत्र (हे.आर.चौ.मी) | आकार रु.पै. |
|---|---|---|---|
| ३६ | ६ | ०–२९–०० पैकी ०–१९–३४ | ५.८१ पैकी ३.८७ |

जमिनमालक श्री. सिताराम हाल्या शिंदे यांचे नावे असलेले क्षेत्र ०–१९–३४ क्षेत्राबाबत

तरी सदरहू मिळकतीवर वा कोणत्याही भागावर गहाण, दान, बक्षिस, फरोक्त, वचनचिठ्ठी, खरेदीखत, तारण, भाडेकरूपणाचा हक्क, पोटगी, साठेकरार, वा तत्सम कोणतेही दावे मालकी वा अन्य हक्क हितसंबंध असलेल्या व्यक्तींनी वा संबधीतांनी ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १४ दिवसांच्या आत आपल्या हक्क, हितसंबंधाचे स्वरूप विषद करून प्रथमदर्शनी कागदोपत्री पुराव्यासह खालील सही करणार यांचे पत्त्यावर लेखी कळवावे. जर वरील मुदतीत कोणाकडूनही काही लेखी हरकत, तक्रार, दावा न आल्यास सदर मिळकत निर्वेध व बोजारहीत असून त्यावर कोणत्याही प्रकारचा दावा, हक्क, हितसंबंध नाही किंवा असल्यास सदर हरकती, तक्रारी रद्दबातल आहेत किंवा त्या सोडून दिल्या आहेत असे गृहीत धरून आमचे अशील सदर व्यवहार पूर्ण करतील, याची तमाम लोकांनी नोंद घ्यावी. व सदर मुदतीनंतर आलेल्या हरकती आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाही.

पनवेल,
दिनांक : २९/०१/२०२६

सही/–
**निलेश द. हातमोडे**
अ‍ॅडव्होकेट

पत्ता :– शॉप नं. १३०, मुन्सीपल शॉपींग कॉम्प्लेक्स, पहीला मजला, भाजी मार्केटजवळ, पनवेल ता. पनवेल, जि. रायगड. ४१०२०६. मो.नं. ८१०८५५८२८९

# सात लाखांचे हेरॉईन जप्त; एकाला अटक

## ◆ नवी मुंबईत होणाऱ्या पुरवठ्याचा पोलिसांनी केला तपास

**नवी मुंबई : रामप्रहर वृत्त**

हेरॉईन या अमली पदार्थ प्रकरणी एका संशयित आरोपीला अटक केले असून त्याच्या कडून सात लाखांचे हेरॉईन जप्त केले आहे. हेरॉईन हा अमली पदार्थ पुरवठा करणाराच अटक करण्यात आल्याने हे अमली पदार्थ विरोधी पथकाचे मोठे यश मानले जात आहे.




साहेब सिंग उर्फ सभा जोगिंदर सिंग असे अटक करण्यात आलेल्या आरोपीचे नाव आहे. त्याला पंजाबमधील अमृतसर येथून अटक करण्यात आली आहे. काही दिवसापूर्वी एपीएमसी पोलीस ठाण्यात हेरॉईन या अमली पदार्थ प्रकरणी गुन्हा नोंद करण्यात आला होता. त्या गुन्ह्याचा तपास करीत असताना सिंग हा उजेडात आला. सिंग हाच नवी मुंबईत येणाऱ्या हेरॉईनचा एक पुरवठादार असल्याचे समोर आल्यावर पोलिसांनी कसून तपास सुरू केला.व त्याला अटक करण्यात यश आले. त्याच्या कडून सात लाख रुपयांचे हेरॉईन जप्त करण्यात आले आहे.

संशयित आरोपी सिंग हा हेरॉईनच्या व्यवहारातील पैसे हे ऑनलाईन पद्धतीने स्वतःच्या खात्यात स्वीकारत असल्याचे तपासात समोर आल्याने त्याचे नाव उघडकीस आले आणि त्याची पूर्ण ओळख पटली, मात्र तो वापरात असलेला मोबाईल अधून मधून बंद करत असल्याने तांत्रिक तपासात अडचणी येत होत्या. मोबाईल बंद करीत असल्याने त्याचे लोकेशन मिळवणे अवघड झाले होते, मात्र तपासात सातत्य राखल्याने तसेच तो वापरात असलेल्या मोबाईलच्या आसपास कुठला मोबाईल ऍक्टिव्ह आहे याचा तांत्रिक तपास केल्यावर तो चार मोबाईल वापरात असल्याचे स्पष्ट झाले. हे चारही मोबाईल जप्त करण्यात आले आहेत.

**पुन्हा एकदा पंजाब कनेक्शन**

नवी मुंबई पोलीस आयुक्त मिलिंद भारंबे यांच्या मार्गदर्शखाली नशा मुक्त नवी मुंबई अभियान गांभीर्याने राबवत आहेत. २०२५ मध्ये नेरूळ येथील एका कारवाईत नवी मुंबईत पंजाब मधून अमली पदार्थाचा पुरवठा होत असल्याची धक्कादायक माहिती समोर आली होती. पंजामध्ये अनेक जण या व्यवसायात असल्याने नवी मुंबईत पुरवठा कोण कोण करतो याची माहिती मिळत नव्हती. याच गुन्ह्याचा तपास करीत असताना केलेल्या कारवाईत अजून चार गुन्हे नोंद करण्यात आले. तसेच एकूण २८ जणांना यापूर्वी अटक करण्यात आले आहे. त्यात दोन दिवसापूर्वी अटक करण्यात आलेला सिंग हा २९ वा आरोपी आहे. हि कारवाई वरिष्ठ पोलीस निरीक्षक संदीप निगडे यांच्या नेतृत्वाखाली सहाय्यक पोलीस निरीक्षक धुमाळ हवालदार तायडे, खिलारे, चव्हाण आणि धोंडे यांनी केली आहे.

# फुंडे विद्यालयात चित्रकला स्पर्धा व वाहतूक सुरक्षेचे प्रबोधन

**उरण : प्रतिनिधी, वार्ताहर**

न्हावाशेवा वाहतुक पोलिसांच्या वतीने वरीष्ठ पोलिस निरीक्षक वैशाली गलांडे यांच्या आधिपत्याखाली उरण तालुक्यातील फुंडे येथील तुकाराम हरी वाजेकर विद्यालयातील विद्यार्थी, विद्यार्थिनींसाठी राष्ट्रीय सुरक्षा सप्ताह अंतर्गत चित्रकला स्पर्धेचे आयोजन व वाहतुक सुरक्षेबाबत प्रबोधन करण्यात आले होते. यामध्ये विद्यालयातील १५० विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला.

अठरा वर्षे पूर्ण होण्यापूर्वी कोणीही वाहन चालवू नये, लर्निंग लायसन्समध्ये कोणीही डबल सीट वाहन चालवणार नाही, अगर चालवल्यास पक्का लायसनधारक पाठीमागे बसलेला असावा, आपण किंवा आपले आई-वडील वाहन चालवीत असताना हेल्मेट घालणे बाबत सूचना द्याव्या तसेच फोरविलर असेल तर सीट बेल्ट लावणे बाबत सूचना द्याव्या,सिग्नल जंप कोणीही करू नये, ट्रिपल सीट कोणीही जाणार नाही व राँग साईड वाहन चालवणार नाही.अशा प्रकारे वाहतुकीबाबत माहिती चित्रकलेच्या माध्यमातून देऊन प्रबोधन करण्यात आले आहे. या वेळी प्रा.बी.बी.साळुंखे, येस.एम. बाबर आदी उपस्थित होते.



# प्रभागातील विविध नागरी समस्या सोडविणार - नगरसेवक शेवाळे

**पनवेल : वार्ताहर**

कळंबोली वसाहतीतील प्रभाग क्रमांक आठ हा सिडकोकालीन रचनेमुळे अनेक वर्षे पायाभूत सुविधांच्या समस्यांना सामोरा जात आहे. जीर्ण इमारती, अपुरी मलनिसारण व्यवस्था, पाणीटंचाई आणि आरोग्य सुविधांचा अभाव यामुळे नागरिकांना मोठा त्रास सहन करावा लागत आहे. या पार्श्वभूमीवर नवनिर्वाचित नगरसेवक रामदास शेवाळे यांनी माझा प्रभाग, माझे व्हिजन ही संकल्पना मांडत प्रभागाचा चेहरामोहरा बदलण्याचा निर्धार व्यक्त केला आहे.

प्रभाग आठमध्ये अनेक भागांत कमी दाबाने पाणी येणे, अनियमित पुरवठा आणि गढूळ पाण्याच्या तक्रारी सातत्याने येतात. यावर कायमस्वरूपी उपाययोजना करण्यासाठी नवीन जलवाहिन्या, जलसाठवण क्षमता वाढवणे आणि वितरण व्यवस्थेचे आधुनिकीकरण करण्याचा प्रस्ताव महापालिकेकडे मांडणार असल्याचे शेवाळे यांनी सांगितले. पाणी ही नागरिकांची मूलभूत गरज आहे. एकही घर पाण्याविना राहणार नाही, यासाठी मी आग्रही भूमिका घेणार,असे त्यांनी स्पष्ट केले. प्रभागातील बहुतांश मलनिसारण वाहिन्या ३० वर्षांपूर्वीच्या आहेत. गळती लागलेल्या या वाहिन्यांमुळे सांडपाणी रस्त्यावर येणे, दुर्गंधी, डासांचे प्रमाण वाढणे आणि पिण्याच्या पाण्यात दूषित पाणी मिसळणे अशा गंभीर समस्या निर्माण झाल्या आहेत.

शेवाळे म्हणाले, सध्याची व्यवस्था पूर्णपणे कालबाह्य झाली आहे. टप्प्याटप्प्याने सर्व वाहिन्या बदलून आधुनिक ड्रेनेज यंत्रणा उभारणे हाच एकमेव पर्याय आहे. यासाठी विशेष निधी मिळविण्यासाठी महापालिका व राज्य सरकारकडे पाठपुरावा करणार असल्याचेही ते सांगतात. मल्टी स्पेशालिस्ट हॉस्पिटल! पनवेल महानगरपालिकेचे प्रस्तावित मल्टी स्पेशालिस्ट हॉस्पिटल प्रभाग आठमध्ये उभारले जाणार आहे. या प्रकल्पामुळे कळंबोली, रोडपाली, तळोजा वसाहतीतील हजारो नागरिकांना तातडीच्या व अत्याधुनिक वैद्यकीय सुविधा उपलब्ध होणार आहेत. रुग्णालयाचे काम लवकर सुरू व्हावे यासाठी सातत्याने पाठपुरावा करणार. सामान्य नागरिकांना उपचारासाठी खासगी रुग्णालयांवर अवलंबून राहावे लागू नये, हे माझे ध्येय आहे,असे शेवाळे यांनी सांगितले.

आमदार प्रशांत ठाकूर यांच्या सहकार्याने राज्य सरकारचे लक्ष वेधून रहिवाशांना हक्काची, सुरक्षित घरे मिळवून देण्याचा निर्धार नगरसेवक रामदास शेवाळे यांनी व्यक्त केला.

# रामशेठ ठाकूर महाविद्यालयात अँटी रॅगिंगबाबत निबंध लेखन स्पर्धा

**खारघर : रामप्रहर वृत्त**

जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेचे खारघर येथील रामशेठ ठाकूर वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयात मंगळवारी (दि.२७) अँटी रॅगिंगसमितीतर्फे महाविद्यालयातील विद्यार्थ्यांमध्ये रॅगिंगविरोधी कायदे व त्याचे दुष्परिणाम याबाबत जनजागृती निर्माण करण्याच्या उद्देशाने निबंध लेखन स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते.

या स्पर्धेला विद्यार्थ्यांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला असून एकूण ५० विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदवला. रॅगिंगमुक्त शैक्षणिक वातावरणाचे महत्त्व, विद्यार्थ्यांचे हक्क व कर्तव्ये तसेच रॅगिंगचे मानसिक व सामाजिक परिणाम या विषयांवर विद्यार्थ्यांनी प्रभावीपणे आपले विचार मांडले. या स्पर्धेचे परीक्षण केल्यानंतर खालील विद्यार्थ्यांनी यश संपादन केले: प्रथम क्रमांक: प्रीती कांकर( एफ वाय बी एम एस) द्वितीय क्रमांक: सोहम म्हात्रे (एफ वाय सी एस) तृतीय क्रमांक: कोमल वैद्य एफ वाय बी कॉम). महाविद्यालयाच्या प्रभारी प्राचार्या डॉ. महेश्वरी झिरपे यांनी या सर्व विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले व शुभेच्छा दिल्या.

या आयोजन अँटी रॅगिंग कमिटीच्या प्रमुख प्रा. प्रतीक्षा पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आले तसेच कमिटीतील इतर सदस्य प्रा. आनंद शेलार, प्रा. प्रमोद वाघे, प्रा. शिवानी मानकामे व प्रा. शिवानी सोनकर व शिक्षकेतर कर्मचारी यांनी या कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी मोलाचे सहकार्य केले.अशा प्रकारचे उपक्रम विद्यार्थ्यांमध्ये सकारात्मक विचारसरणी रुजवून सुरक्षित व मैत्रीपूर्ण शैक्षणिक वातावरण निर्माण करण्यास उपयुक्त ठरतात, असे मत उपस्थितांनी व्यक्त केले.



# 'केबीपी'ची अनुराधा गायकवाड राष्ट्रीय निबंध स्पर्धेत प्रथम



**नवी मुंबई : बातमीदार**

रयत शिक्षण संस्थेच्या छत्रपती शिवाजी कॉलेज सातारा व कर्मवीर भाऊराव पाटील विद्यापीठ सातारा यांच्या संयुक्त विद्यमाने भारतीय संविधान अमृत महोत्सव व वंदे मातरम उत्सव राष्ट्रीय निबंध स्पर्धा आयोजित केली होती.

या राष्ट्रीय निबंध स्पर्धेत कर्मवीर भाऊराव पाटील कॉलेजच्या अनुराधा गायकवाड या विद्यार्थिनीने प्रथम क्रमांक प्राप्त केला. जागतिक राज्यघटना व भारतीय राज्यघटना याची तुलना या विषयावर तिने बाराशे शब्दांचा निबंध लिहिला होता. दि. २० जानेवारी रोजी निबंध स्पर्धेचा निकार जाहीर करून दि. २६ जानेवारी रोजी अनुराधा गायकवाड हिला रोख तीन हजार रुपये, सन्मानचिन्ह व प्रमाणपत्र देऊन गौरविण्यात आले. ही विद्यार्थिनी एस.वाय.बी. एस्सी मध्ये शिकत आहे.

महाविद्यालयाच्या प्राचार्या डॉ. शुभदा नायक यांनी तिच्या यशाचे भरभरून कौतुक करून अभिनंदन केले. सदर विद्यार्थिनीने यापूर्वीही विविध निबंध स्पर्धे त यश मिळवले आहे. सांस्कृतिक विभागप्रमुख डॉ. आबासाहेब सरवदे यांनी तिला मार्गदर्शन केले. तिच्या या यशाबद्दल शिक्षकवृंदानी अभिनंदन केले.

# जेएनपीए बंदरातून निर्यात-आयातमध्ये वाढ

**उरण : बातमीदार, वार्ताहर**

भारताचे पहिले बहुउत्पादन, बंदराधारित विशेष आर्थिक क्षेत्र (विआक्षे) असलेल्या जेएनपीए विआक्षे ने पंचांग वर्ष २०२५ मध्ये कंटेनर हाताळणीत भक्कम कामगिरी नोंदवली असून, यामुळे वाढलेली व्यापारगतिविधी आणि निर्यात-आयात भागधारकांमधील वाढता विश्वास स्पष्टपणे दिसून येतो.



पंचांग वर्ष २०२५ दरम्यान जेएनपीए विआक्षे ने एकूण २०,६९३ टीईयू इतका निर्यात-आयात कंटेनर व्यवहार हाताळला, जो पंचांग वर्ष २०२४ मधील १६,३१२ टीईयूच्या तुलनेत असून, यामध्ये सुमारे २६.८६% वर्ष-दर-वर्ष वाढ नोंदवली गेली आहे. एकूण कंटेनर हाताळणीत झालेली ही लक्षणीय वाढ औद्योगिक कार्यक्षमता, सुधारित लॉजिस्टिक्स कार्यक्षमता तसेच विआक्षेमधून होणाऱ्या मालवाहतुकीतील वाढ अधोरेखित करते.

कामगिरीवर प्रतिक्रिया देताना गौरव दयाल, भा. प्र. से., अध्यक्ष, जेएनपीए, म्हणाले, पंचांग वर्ष २०२५ दरम्यान जेएनपीए विआक्षे मध्ये एकूण निर्यात-आयात व्यवहारात झालेली मजबूत वाढ ही विआक्षेच्या पायाभूत सुविधा आणि सुलभीकरण क्षमतेवर व्यापार व उद्योग क्षेत्राने दाखवलेल्या वाढत्या विश्वासाचे प्रतीक आहे. जेएनपीए विआक्षे पारंपरिक टर्मिनल-केंद्रित भूमिकेपलीकडे जाऊन, एकात्मिक बंदर परिसंस्था म्हणून आपले स्थान अधिक दृढ करत आहे. हा सर्वसमावेशक आराखडा उद्योगांसाठी मूल्यनिर्मितीला चालना देण्यासाठी, पुरवठा साखळीतील प्रवाहीपणा वाढवण्यासाठी आणि संपूर्ण हितधारक समुदायासाठी दीर्घकालीन लाभ निर्माण करण्यासाठी तयार करण्यात आला आहे.

जेएनपीए विशेष आर्थिक क्षेत्र एकूण २७७.३८ हेक्टर क्षेत्रफळावर पसरलेले आहे. यापैकी १२९.७३ हेक्टर क्षेत्र आधीच भाडेपट्ट्यावर देण्यात आले असून, भविष्यातील भाडेपट्ट्यासाठी ३४.१६ हेक्टर क्षेत्र उपलब्ध आहे. सध्या या विआक्षेमध्ये ११ कार्यरत युनिट्स तसेच एक फ्री ट्रेड वेअरहाऊसिंग झोन (एफटीडब्ल्यूझेड) कार्यरत असून, यामुळे सातत्यपूर्ण औद्योगिक हालचाल आणि पुढील विकासासाठी मोठी संधी अधोरेखित होते.

निर्यात-आयात व्यवहारातील सातत्यपूर्ण वाढ जेएनपीए विआक्षे ची एक महत्त्वपूर्ण व्यापार व लॉजिस्टिक्स केंद्र म्हणून असलेली भूमिका अधिक दृढ करते. रणनीतिक स्थान, बंदराशी अखंड जोडणी तसेच उद्योगस्नेही वातावरणाच्या बळावर जेएनपीए विआक्षे देशांतर्गत व आंतरराष्ट्रीय व्यापारासाठी एक विश्वासार्ह केंद्र म्हणून पुढे येत आहे.

# प्रा.डॉ.हन्नत शेख यांना पीएचडी प्राप्त

**उरण : बातमीदार**

कोकण ज्ञानपीठ उरण वाणिज्य व कला महाविद्यालय, उरण रायगड येथील अकाउंट अँड फायनान्स विभागातील प्रा.हन्नत शेख यांना मुंबई विद्यापीठाच्या वतीने पीएचडी (विद्या वाचस्पती) प्रदान करण्यात आली. उरण महाविद्यालयातील वाणिज्य विभागाच्या संशोधन केंद्राचे प्रमुख डॉ.पि.आर.कारुळकर यांच्या मार्गदर्शनाखाली त्यांनी व्यापार धोरण आणि प्रशासन या विषयातून मुंबई विद्यापीठाची (विद्या वाचस्पती) संशोधन पदवी (झह.ऊ) पदवी प्राप्त केली आहे.



त्यांच्या संशोधनाचा विषय An Analysis of Corporate Social Responsibility Activities of Companies with Special Reference to Raigad District. रायगड जिल्ह्याच्या विशेष संदर्भात: कंपन्यांच्या कॉर्पोरेट सामाजिक जबाबदारी उपक्रमांचे विश्लेषण होता.

उरण महाविद्यालयाच्या वाणिज्य विभागातील संशोधन केंद्रातून त्या पीएचडी प्राप्त प्रथम विद्यार्थिनी ठरल्या आहेत. तसेच मार्गदर्शक म्हणून लाभलेले डॉ. पी. आर. कारुळकर यांच्याही त्या पीएचडी संशोधन करणाऱ्या प्रथम विद्यार्थिनी आहेत.

महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. वाल्मिक गर्जे, वडील युसुफ ताहीर शेख व आई मिनाज शेख, पती समिर अहमद, संस्थेचे अध्यक्ष तथा उपाध्यक्ष तसेच सर्व व्यवस्थापन समिती सदस्य, महाविद्यालयातील शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी यांनी त्यांचे हार्दिक अभिनंदन करून त्यांना पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या आहेत.

# 'थ्री आर' अंतर्गत शाळा व संस्थांना बेंचेसचे वितरण



**नवी मुंबई : बातमीदार**

प्रजासत्ताक दिनाचे औचित्य साधून नवी मुंबई महानगरपालिका आणि प्रोजेक्ट मुंबई यांच्या संयुक्त सहभागातून संकलित सिंगल यूज प्लास्टिकवर पुनर्प्रक्रिया करून तयार केलेल्या बेंचेसचे वितरण नमुंमपा आयुक्त डॉ.कैलास शिंदे यांच्या हस्ते महानगरपालिका क्षेत्रातील शाळांना प्रातिनिधिक स्वरूपात करण्यात आले.

या उपक्रमात माइंडस्पेस रिट यांचे विशेष सहकार्य लाभले असून त्यांच्या सहयोगाने सातत्याने सहभागी होणाऱ्या २५ शाळा, ४ सोसायट्या, ४ स्वयंसेवी संस्था व २ कॉर्पोरेट कार्यालये यांना ३५ गार्डन बेंचेस उपक्रमाच्या पहिल्या टप्प्यात देण्यात येत आहेत. त्या बेंचेसचे प्रातिनिधिक स्वरूपात वितरण आज प्रजासत्ताक दिनाचे औचित्य साधून 'स्वच्छ भारत मिशन' अंतर्गत सुरू होत असलेल्या 'स्वच्छ सवयींमधून स्वच्छ भारत' या विशेष अभियानांतर्गत नमुंमपा शाळा क्र. ०२ दिवाळेगाव, नमुंमपा शाळा क्र. ११७ दिवाळे, नमुंमपा शाळा क्र. १० नेरूळगाव, एमईएस विद्यामंदीर बेलापूर, विद्याभवन शाळा सेक्टर १८ नेरूळ, ज्ञानदीप सेवा मंडळ शाळा करावेगाव अशा सहा शाळांना करण्यात आले.

विशेष म्हणजे हे पुनर्प्रक्रियाकृत बेंचेस विद्यार्थी आणि नागरिक यांनी आकर्षक रंगांनी व चित्रांनी सजविले आहेत.



**पनवेल : भाजप युवा मोर्चाचे पळस्पे विभागीय अध्यक्ष योगेश लहाने यांना वाढदिवसानिमित्त माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी शुभेच्छा दिल्या. या वेळी भाजपचे पळस्पे विभागीय अध्यक्ष अनेश ढवळे, महेश लहाने, नरेश लहाने, नरेश गायकर, अविनाश खेत्री आदी उपस्थित होते.**

# आत्मनिर्भर भारत संकल्पनेवर आधारित नृत्य सादरीकरण

**नवी मुंबई : प्रतिनिधी**

माईर्स एमआयटी पुणे संचालित विश्वशांती गुरुकुल स्कूलमध्ये प्रजासत्ताकदिन देशभक्तीच्या वातावरणात साजरा करण्यात आला.

विद्यार्थ्यांमध्ये राष्ट्रप्रेम, शिस्त व एकतेची भावना निर्माण करण्याच्या उद्देशाने आयोजित करण्यात आलेल्या कार्यक्रमास प्रमुख पाहुणे म्हणून भारतीय नौदलाचे मरीन कमांडो फोर्सचे (मार्कोस) माजी अधिकारी रवी कुलकर्णी उपस्थित होते. त्यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आले. यानंतर विद्यार्थ्यांच्या देशभक्तीपर समूहगीताने उपस्थितांमध्ये राष्ट्राभिमानाची भावना जागृत केली.

विद्यार्थ्यांनी 'समृद्धीचा मंत्र, आत्मनिर्भर भारत' या विषयावर प्र भाषण सादर करत स्वावलंबनाचे महत्त्व अधोरेखित केले. रवी कुलकर्णी यांनी प्रेरणादायी भाषणातून देशप्रेम, शिस्त, धैर्य व राष्ट्रसेवेचे महत्त्व सांगत विद्यार्थ्यांना प्रेरित केले.



# आजपासून जिल्ह्यात 'स्पर्श' कुष्ठरोग जनजागृती अभियान

**अलिबाग : प्रतिनिधी**

कुष्ठरोगाबाबत समाजातील गैरसमज दूर करून रुग्णांप्रति सकारात्मक दृष्टीकोन निर्माण करण्याच्या उद्देशाने 'स्पर्श' कुष्ठरोग जनजागृती अभियान ३० जानेवारी ते १३ फेब्रुवारीदरम्यान विविध उपक्रमांद्वारे राबविण्यात येणार आहे. 'भेदभाव समाप्त करूया, सन्मानाची वागणूक देऊया' हे यावर्षीच्या अभियानाचे घोषवाक्य आहे.



या अभियानांतर्गत जिल्हा आरोग्य विभागाच्या वतीने प्रभात फेरी, जनजागृती रॅली, शाळा व महाविद्यालयांमध्ये मार्गदर्शन सत्रे, पोस्टर व घोषवाक्य प्रदर्शन, आरोग्य शिबिरे, तसेच ग्रामसभा व सार्वजनिक ठिकाणी कुष्ठरोगाबाबत माहितीपर कार्यक्रमांचे आयोजन करण्यात येणार आहे. कुष्ठरोग हा पूर्णपणे बरा होणारा आजार असून वेळेवर निदान व उपचार केल्यास अपंगत्व टाळता येते, हा संदेश जनतेपर्यंत पोहोचविण्यावर विशेष भर देण्यात येणार आहे.

कुष्ठरोगाची लक्षणे हळूहळू दिसून येतात. त्यामुळे ती वेळीच ओळखणे महत्त्वाचे आहे. कोणतेही लक्षण आढळल्यास तत्काळ जवळच्या आरोग्य केंद्रात तपासणी करून घ्यावी, मोफत उपचारांचा लाभ घ्यावा, असे आवाहन जिल्हाधिकारी किसन जावळे, जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी नेहा भोसले, जिल्हा शल्य चिकित्सक डॉ. निशिकांत पाटील, जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. प्राची नेहूलकर यांनी केले आहे.

# युतीच्या उमेदवारांना गावबैठकांमध्ये नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद

**नागोठणे : बातमीदार**



देशात पंतप्रधान नरेंद्रजी आणि राज्यात मुख्यमंत्री देवेंद्रजी व उपमुख्यमंत्री अजितदादा यांच्या नेतृत्वाखाली राज्यात विकासाची गंगा वाहत आहे. आमच्या वांगणी ग्रामपंचायतीमध्ये राष्ट्रवादी काँग्रेस व भाजपाच्या माध्यमातून अनेक विकासकामे झाली आहेत. विरोधकांनी केलेला विकास इथे शोधूनही कुठेच दिसत नाही. कॉन्ट्रॅक्टर म्हणूनही यांनी सर्वत्र अनेक योजना अपूर्ण ठेवल्याचे लोकांची ओरड ऐकून समजते. किशोरशेठ यांनी आमडोशी गावात पाण्याची पहिली योजना राबविली हे आम्ही कदापि विसरणार नसून विकास कामांमुळेच युतीच्या तीनही उमेदवारांचा विजय पक्का आहे असा ठाम विश्वास भाजपाचे जिल्हा उपाध्यक्ष सोपानभाऊ जांबेकर यांनी आमडोशी येथील गावबैठकीत व्यक्त केला.

यावेळी राष्ट्रवादीचे विभागीय युवक अध्यक्ष प्रमोद जांबेकर यांनी आपल्या मनोगतात ज्याप्रमाणे लोकसभा व विधानसभा निवडणुकीत खासदार सुनील तटकरे व आमदार रवीशेठ पाटील यांना आमडोशीतील दोन्ही मतपेट्यांत भरभरून मते मिळाली तशीच मते या निवडणुकीत किशोरभाई जैन व योगिताताई शिद यांना मिळतील आणि दोन्ही मतपेट्यांत घड्याळाचा गजर व कमळ फुलेल असा विश्वास प्रमोद जांबेकर यांनी व्यक्त केला.

रायगड जिल्हा परिषदेच्या नागोठणे गटाचे राष्ट्रवादी काँग्रेस व भाजपा युतीचे उमेदवार किशोरशेठ जैन व पंचायत समितीच्या सुकेळी गणाच्या उमेदवार योगिता शिद यांच्या प्रचारार्थ आमडोशी येथे शरद कामथे यांच्या निवासस्थानी मंगळवारी (दि.२७) सायंकाळी आयोजित केलेल्या या बैठकीला राष्ट्रवादीचे विभागीय नेते भाईसाहेब टके, शिवरामभाऊ शिंदे, सोपान जांबेकर, संजय भोसले, किशोरभाई म्हात्रे, एकनाथ जांबेकर, भाजपाचे तालुका सरचिटणीस एकनाथ ठाकूर, राष्ट्रवादीचे विभागीय युवक अध्यक्ष प्रमोद जांबेकर, शरद कामथे, प्रमोद भोसले, वांगणीच्या माजी सरपंच सोनम भोसले, रोशनी भोसले, अमित जांबेकर, राजू जांबेकर, रमण जांबेकर,आदीं उपस्थित होते.

# काँग्रेस मावळ लोकसभा मतदारसंघाच्या कार्याध्यक्षांचा पक्षाला राम राम

**चौक : प्रतिनिधी**

राष्ट्रीय काँग्रेस पक्षाने जिल्हा परिषद अथवा पंचायत समितीचे तिकीट देण्याचे कबूल करून ऐन वेळी नाकारल्याने आणि इ फॉर्म न दिल्याने अखेर पक्षाला राम राम करीत असल्याचे राजीनामा पत्र शांताराम भदे यांनी प्रदेश काँग्रेस कमिटी अध्यक्ष हर्षवर्धन सपकाल यांना पाठविले आहे,



त्यांनी आपल्या राजीनामा पत्रात, मी काँग्रेस पक्षाचा सदस्य असुन व मावळ लोकसभा काँग्रेस पक्षाचा कार्याध्यक्ष आहे. मी गेले कित्येक वर्ष पक्षासाठी काम करीत आहे. मी पक्ष वाढीसाठी भरपूर काम केले आहे. परंतु जिल्हा परिषद व पंचायत समिती या निवडणूकीसाठी पत्नीला पंचायत समितीचे तिकीट नाकारल्याने आपण पक्षाचा राजीनामा देत असल्याचे म्हटले आहे.

शांताराम भदे हे माजी सरपंच असून अनेक वर्ष पक्षाशी एक निष्ठ आहेत. मावळ लोकसभा मतदारसंघात त्यांचे पक्षासाठी मोठे योगदान आहे,पक्ष नेतृत्व असा अन्याय करीत असेल तर प्रामाणिक माणूस पक्ष वाढीसाठी कसा प्रयत्न करेल, असे त्यांनी माध्यमांशी बोलताना सांगितले. त्यांच्या राजीनाम्याने जिल्हा परिषदेचे महायुतीचे उमेदवार ज्ञानेश्वर गायकवाड आणि गौरी गडगे यांना एक प्रकारे मदतच होईल, असे बोलले जाते.

# खालापुरात जिल्हा परिषदेला ११ तर पंचायत समितीसाठी १७ उमेदवार

**खोपोली: प्रतिनिधी**

तालुक्यातील चार जिल्हा परिषद गटासाठी पन्नास टक्के उमेदवारी अर्ज मागे घेण्यात आले असून अकरा उमेदवार चार गटात शिल्लक आहेत. आठ पंचायत समिती गणात चाळिस उमेदवारा पैकी तेवीस जणांनी माघार घेतल्यावर सतरा उमेदवार शिल्लक राहिले आहेत.

खालापुरातील सावरोली जि. प. गटात सर्वाधिक नऊ उमेदवारी अर्ज दाखल झाले होते. मंगळवारी सहा जणांनी माघार घेतली. चौक जि. प. गटात चार उमेदवारी अर्ज दाखल करण्यात आले होते त्यापैकी दोन उमेदवारांनी माघार घेतल्यामुळे थेट लढत होणार आहे. वासंबे जि. प. गटामध्ये पाच जणांनी उमेदवारी अर्ज दाखल केले होते त्यापैकी दोन जणांनी माघार घेतली आहे.आत्करगाव जि.प. गटात सहा उमेदवारी अर्ज दाखल झाले होते. याठिकाणी तीन उमेदवारांनी माघार घेतल्याने तीन उमेदवार रिंगणात आहेत.

चौक पंचायत समिती गणातून ३ उमेदवारापैकी एकाने माघार घेतल्यावर थेट लढत होणार आहे. हाळखुर्द गणातून ५ पैकी दोघांनी माघार घेतली आहे. तर एक अर्ज बाद झाला होता.याठिकाणी देखील थेट लढत होणार आहे.वासांबे गणात ४ पैकी एक अर्ज अवैध तर एकाने माघार घेतली आहे. रिस पं.स. गणात ७ उमेदवारा पैकी चार जणांनी उमेदवारी अर्ज मागे घेतले आहेत. तिरंगी लढत होणार आहे.

वाशिवली पं.स. गण ५ उमेदवारापैकी एक अर्ज अवैध तर दोन जणांनी माघार घेतली आहे. सावरोली पं. स. गण ५ उमेदवारापैकी तीन जणांनी माघार घेतल्यामुळे थेट लढत होणार आहे. खानाव गण ७ पैकी चार जणांनी माघार घेतली आहे एक अवैध ठरला होता.

# कर्जतमध्ये शिवसेना शिंदे गट, भाजप, शेकाप आणि आरपीआयची महायुती

**कर्जत : प्रतिनिधी**

कर्जत तालुक्यातील सहा जिल्हा परिषद गट आणि कर्जत पंचायत समितीचे १२ गण यात शिवसेना शिंदे गटाने भारतीय जनता पक्ष, आरपीआय आणि शेकाप यांची युती झाली असल्याची घोषणा आमदार महेंद्र थोरवे यांनी पत्रकार परिषदेत केली.




कर्जत मधील बाळासाहेब भवनच्या सभागृहात पत्रकार परिषदेचे आयोजन करण्यात आले होते. या पत्रकार परिषदेला शिवसेना जिल्हा प्रमुख संतोष भोईर, भाजप जिल्हा सरचिटणीस दीपक बेहेरे, रमेश मुंढे, आरपीआय आठवले गट जिल्हा अध्यक्ष नरेंद्र गायकवाड, राहुल डाळिंबकर, शेकाप तालुका चिटणीस तानाजी मते, जिल्हा खजिनदार श्रीराम राणे, भाजपचे तानाजी चव्हाण, भाजप ग्रामीण मंडळाचे अध्यक्ष दिनेश रसाळ तसेच माजी नगराध्यक्ष शरद लाड आदी उपस्थित होते.

महायुतीचे प्रमुख म्हणून आमदार महेंद्र थोरवे यांनी 'भाजपला कर्जत पंचायत समिती आणि शेतकरी कामगार पक्ष यांना प्रत्येकी तीन जागा देण्यात आल्या आहेत. या ठिकाणी भाजप कडून अर्ज भरले होते. वरिष्ठ पातळीवर चर्चा झाली आणि एक वगळता सर्व अर्ज पक्षाच्या कार्यकर्त्यांनी मागे घेतले आहेत.

माणगाव तर्फ वरेडी तेथे मैत्रीपूर्ण लढत होणार असून २२ गटांपैकी एका जिल्हा परिषद गटात अशी लढत होत आहे. भाजप माणगाव तर्फे वरेडी येथे भाजप कार्यकर्ते कोणाचे काम करणार याचा निर्णय आम्ही एकत्र येऊन घेऊ असे उत्तर भाजप सरचिटणीस बेहेरे यांनी दिले. आरपीआय आठवले गटाचे जिल्हा अध्यक्ष नरेंद्र गायकवाड यांनी आमचे कार्यकर्ते नाराज नाहीत असे यावेळी जाहीर केले.

आमचा संपूर्ण पक्ष यावेळी महायुती सोबत असल्याचे शेकापने यावेळी जाहीर केले असून आम्ही शेकाप निवडणुकीची गणिते आर्थिक बनली असल्याने आम्ही आमची ताकद असल्याच्या ठिकाणी देखील आम्ही उमेदवार देऊ शकलो नाही पण आम्हाला आमदार थोरवे यांच्याकडून कळंब आणि कशेळे भागातील उमेदवार यांना तुमचेच आहेत असे समजून त्यांना निवडून आणण्याचे आवाहन केले असून आम्ही ती उणीव भरून काढणार असल्याचे मत त्यांनी जाहीर केले.

# सीमा सुरक्षा दल जवान राज सुतार यांचा गौरव सोहळा

**माणगाव: बातमीदार**

माणगाव तालुक्यातील जिता बोरवली गावातील अतिशय प्रतिकूल परिस्थितीत शिक्षण घेऊन सीमा सुरक्षा दलामध्ये पश्चिम बंगाल येथे निवड झालेल्या राज रामजी सुतार या तरूण जवानाचा सन्मान सोहळा बोरवली ग्रामस्थांकडून आयोजित करण्यात आला होता.

सीमा सुरक्षा दलासाठी निवड होतानाचे खडतर प्रशिक्षण राज सुतार याने पूर्ण केल्याने पश्चिम बंगाल मध्ये १४ नंबर बटालियन मध्ये रूजू झाला आहे. आपल्या गावातील होतकरू जिद्दी तरूणाची देशसेवेसाठी निवड झाल्याबद्दल बोरवली ग्रामस्थांनी भव्यदिव्य जंगी मिरवणूक आणि सत्कार आयोजित केला . यावेळी गावातील महिलांनी औक्षण करून पुष्पवृष्टी आणि ढोलताशाच्या गजरात जिते ते बोरवली गावापर्यंत जंगी मिरवणूक काढली.



सत्कार सोहळ्यात उपस्थित माजी सैनिकांनी राज सुतारचे कौतुक करत मार्गदर्शन केले. भारतीय सीमा सुरक्षा दलातील जवान दिवसरात्र डोळ्यात तेल घालून सीमेचं रक्षण करीत आहेत म्हणूनच हिंदुस्थानातील जनता सुखाने नांदत आहे , याच दलात राज नक्कीच चांगली कामगिरी करून बोरवली गावाचं नाव उज्वल करेल असे मत रामजी कदम यांनी व्यक्त केले.

याप्रसंगी माजी सैनिक सुभेदार विष्णू सावंत, सुभेदार सुरेश गायकवाड, कॅप्टन निर्मलसिंग रंधवा , माजी सैनिक हवालदार प्रमोद शिंदे पंचायत समितीचे माजी उपसभापती तुकाराम सुतार, इतिहास अभ्यासक रामजी कदम,समाजसेवक बाबूशेठ उर्फ चंद्रशेखर खानविलकर, टीम कुर्डूगडचे प्रमुख दिवेश कदम मान्यवर उपस्थित होते. यावेळी राज सुतारच्या भावी कारकिर्दीसाठी सेना उपजिल्हाप्रमुख युवा अविनाश नलावडे यांनी शुभेच्छा दिल्या. बोरवली गावातील तरूण कार्यकर्ते तुकाराम महाळुंगे, सचिन बगडे , तुकाराम साळवी , जयेश साळवी , चिंतन पंदेकर,भरत सुतार, शरद हळदे यांनी सोहळ्याचे उत्तम नियोजन केले होते.

# राष्ट्रवादी काँग्रेस व भाजप युतीचे किशोर जैन यांना शेकापचा जाहीर पाठिंबा

**नागोठणे: बातमीदार**

पक्ष संघटनेचे हित व विकासाचे धोरण या तत्वावर शेकाप नेत जयंतभाई पाटील यांच्या आदेशाने नागोठणे विभागातील शेतकरी कामगार पक्षाच्या पदाधिकारी व कार्यकर्त्यांनी राष्ट्रवादी काँग्रेस व भाजप युतीचे नागोठणे जिल्हा परिषदेचे उमेदवार किशोर जैन, नागोठणे पंचायत समितीच्या उमेदवार समृद्धी संतोष कोळी व ऐनघर पंचायत समितीच्या उमेदवार योगिता विलास शिद यांना जाहीर पाठिंबा देऊन तीनही उमेदवारांच्या विजयाची गाव्ही दिली.



दरम्यान शेकापच्या निर्णयाचे स्वागत करून विकासाच्या विषयात नेहमीच वाटा दिला जाईल अशी ग्वाही यावेळी किशोर जैन यांनी दिली. शेकापच्या पाठिंबा बाबत नागोठणे वेलशेत येथील भारतीय एज्युकेशन सोसायटीच्या कार्यालयात झालेल्या बैठकीत राष्ट्रवादचे नेते शिवरामभाऊ शिंदे, किशोर जैन, संजय भोसले, भाई शिर्के, राजा जांबेकर, धर्मा भोपी, ॲड. रोशन पाटील, शेकाप जिल्हा चिटणीस सदस्य तुकाराम खांडेकर गुरुजी, शेकाप नेते डॉ. अन्वर हाफिज, रोहा ता. कामगार युनियन संघटना सदस्य दिपक माळी, पिगोंडे माजी सरपंच कांचनताई माळी, माजी उपसरपंच जनार्दन सकपाळ, सुधीर पारंगे, शेकाप विभागीय चिटणीस प्रविण जांबेकर, यांच्यासह शेकाप कार्यकर्ते उपस्थित होते.

# स्मार्ट विद्युत मीटर बसविण्यासाठी जनजागृती

## खालापूर आणि खोपोली उपविभागांचा उपक्रम

**चौक : प्रतिनिधी**

घरगुती वापरासाठी स्मार्ट विद्युत मीटर बसविण्यासाठी जनजागृती महाराष्ट्र राज्य विद्युत मंडळ यांच्या खालापूर व खोपोली उपविभाग यांच्या कडून खोपोली ते खालापूर बाईक रॅली काढून जनजागृती करण्यात आली.यावेळी खालापूर, खोपोली, चौक येथील अधिकारी, कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

स्मार्ट विद्युत मीटर हे ग्राहकांना वीज वापरावर थेट नियंत्रण देणारे आधुनिक प्रगत तंत्रज्ञान आहे. हे मीटर मोबाईल पद्वारे रिअल-टाइम (तात्काळ) वापराची माहिती सुद्धा देते, अचूक बिलिंग देणे,आणि प्रीपेड रिचार्जची सुविधा देखील मिळते.यामुळे वीज बचत आणि बिलात कपात होण्यास मदत होते, असा दावा करण्यात येत आहे. यासाठी मीटर रीडर याने रिडिंग घेण्याची गरज राहणार नाही. कारण याचा डेटा थेट महावितरणला जातो, त्यामुळे रिडिंग चुकण्याची शक्यता नाही.

ग्राहकांना किती वीज वापरली गेली, हे त्यांच्या मोबाईल पवर पाहता येणार आहे. रिचार्ज करून वीज वापरता येईल,ज्यामुळे थकबाकी होणार नाही आणि आर्थिक नियोजन करण्यास सुलभ होईल. अवास्तव वापराची माहिती या मीटर द्वारे मिळाल्याने वीज वापर करताना काटकसर होईल, आणि बिलात बचत होईल. प्रीपेड स्मार्ट मीटर वापरल्यास वीज आकार आणि इंधन समायोजन आकारावर २ टक्के रिबेट (सवलत) मिळणार आहे.

मीटर बंद किंवा नादुरुस्त झाल्यास त्याची माहिती त्वरित वीज कंपनीला मिळनार आहे, अशी माहिती खालापूर उप कार्यकारी अभियंता महादेव मुंढे यांनी दिली. यावेळी खोपोली चे उप कार्यकारी अभियंता वाघमोडे,चौकचे अभियंता योगेश देसाई व कर्मचारी उपस्थित होते.





# मोरे महिला महाविद्यालयाचा 'उडाण' महोत्सवात सहभाग

**रोहे : प्रतिनिधी**

मुंबई विद्यापीठाच्या आजीवन अध्ययन व विस्तार विभागा (डीएलएलई)च्या 'उडाण महोत्सव-२०२६' चे आयोजन सुंदरराव मोरे कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, पोलादपूर, जि. रायगड येथे शनिवार (दि. २४ जानेवारी ) रोजी करण्यात आले. रायगड जिल्ह्यातील १८ पदवी आणि पदव्युत्तर महाविद्यालये या महोत्सवात सहभागी झाली होती.

एम बी मोरे फाऊंडेशनचे सौ वरदा सुनील तटकरे कला, वाणिज्य आणि विज्ञान महिला महाविद्यालयाच्या डीएलएलई विभागांतील विद्यार्थिनींनी पथनाट्य सादरीकरण, पोस्टर मेकिंग, वक्तृत्व आदी स्पर्धांमध्ये सहभाग घेऊन या महोत्सवात आपले कौशल्य प्रभावीपणे सादर केले.

त्यांच्या उत्कृष्ट सादरीकरणाची परीक्षकांनी प्रशंसा केली. एम बी मोरे महिला महाविद्यालयाच्या आजीवन अध्ययन व विस्तार समितीच्या प्रमुख प्रा. शिल्पा खाडे आणि प्रा माधुरी जाधव यांच्यासह १८ विद्यार्थिनींनी सहभाग घेतला.

# माणगावात अजितदादा पवार यांना कडकडीत बंद पाळून भावपूर्ण श्रद्धांजली

**माणगाव: प्रतिनिधी**

राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे अध्यक्ष व महाराष्ट्र राज्याचे उपमुख्यमंत्री अजितदादा पवार यांच्या आकस्मिक निधनाची बातमी माणगाव तालुक्यात पोहोचताच संपूर्ण परिसर शोकमग्न झाला. आपला माणूस गेला अशी भावना प्रत्येकाच्या मनात दाटून आली. गुरवार दि.२९ जानेवारी रोजी माणगावकरांनी कडकडीत बंद पाळून उपमुख्यमंत्री अजितदादा पवार यांना भावपूर्ण श्रद्धांजली अर्पण केली.




या दुःखाला शब्द अपुरे पडत असतानाच, अजितदादा पवार यांच्याविषयी असलेले अपार प्रेम,ऋणानुबंध आणि कृतज्ञता व्यक्त करण्यासाठी माणगाव शहरासह संपूर्ण तालुक्यात उत्स्फूर्तपणे कडकडीत बंद पाळण्यात आला. नागरिक, व्यापारी, शेतकरी,युवक,ामहिला सर्वजण एकत्र येत दादांना अश्रूंनी श्रद्धांजली अर्पण करीत होते.

तालुक्यातील सर्व शाळा, महाविद्यालये पूर्णतः बंद ठेवण्यात आली होती. बाजारपेठा ओस पडल्या होत्या. छोटी-मोठी दुकाने, हातगाड्या,टपऱ्या बंद होत्या. रस्त्यांवर शांतता होती,मात्र प्रत्येकाच्या मनात दुःखाचा कल्लोळ उसळत होता.

सर्व राजकीय पक्षांनी प्रचार थांबवून अजितदादा पवार यांच्या स्मृतीस वंदन केले. माणगाव आज राजकारणाच्या पलिकडे जाऊन माणुसकीच्या भावनेने एकवटले होते. माणगाव शहर आणि तालुक्याशी अजितदादा पवार यांचे नाते केवळ राजकीय नव्हते,तर ते जिव्हाळ्याचे, आपुलकीचे होते. विविध कार्यक्रमांच्या निमित्ताने दादा अनेकदा माणगावात येत असत.

माणगावच्या विकासासाठी त्यांनी नेहमीच ठाम आणि सकारात्मक भूमिका घेतली. अनेक रखडलेल्या विकास कामांना गती दिली, तर अनेक नवीन प्रकल्पांना मंजुरी देत आर्थिक बळ दिले.

माणगाव शहरातील पाणीपुरवठा योजना,तहसील कार्यालय,पंचायत समिती कार्यालय, खारभूमी कार्यालय,नगरपंचायत इमारत,मुंबई-गोवा महामार्ग,माणगाव व इंदापूर बायपास,काळ व गोद नदीवरील पूल,द. ग. तटकरे महाविद्यालय,श्रीमती गीता तटकरे कॉलेज ऑफ नर्सिंग,अशोकदादा साबळे विधी महाविद्यालय अशा असंख्य पायाभूत, शैक्षणिक आणि सामाजिक विकास कामांमध्ये अजितदादा पवार यांचे अमूल्य योगदान लाभले आहे.

# मुंबईत रंगणार महाराष्ट्र ओपन कॅरम चॅलेंजर्स ट्रॉफी स्पर्धा

**मुंबई : प्रतिनिधी**

महाराष्ट्र कॅरम असोसिएशनच्या वतीनं आयोजित करण्यात आलेली तिसरी महाराष्ट्र ओपन कॅरम चॅलेंजर्स ट्रॉफी २०२५–२६ ही स्पर्धा यंदा महिला खेळाडूंना विशेष केंद्रस्थानी ठेवणारी ठरणार आहे. २९ व ३० जानेवारी २०२६ रोजी दादर येथील हॉलमध्ये ही स्पर्धा पार पडणार असून, देशभरातील तसंच परदेशातील ५५ महिला कॅरमपटूसह ५०० खेळाडू या स्पर्धेत आपले कौशल्य दाखवणार आहेत.



या स्पर्धेत पुरुष व महिला दोन्ही गटांचा समावेश असला, तरी महिलांच्या सहभागासाठी विशेष प्रोत्साहन देण्यात आलं आहे. महिला खेळाडूंना प्रोत्साहन देण्यासाठी स्वतंत्र पारितोषिके, बक्षिसांची रक्कम आणि सन्मान देण्यात येणार असल्याची माहिती आयोजकांनी दिली. तसंच महाराष्ट्रासह दिल्ली, बंगाल, गोवा, केरळ, कर्नाटक, तामिळनाडू, गुजरात, उत्तर प्रदेश, बिहार, ओडिशा, झारखंड, उत्तराखंड, तेलंगणा आदी राज्यांतील महिला खेळाडू या स्पर्धेत सहभागी होणार आहेत. विशेष म्हणजे, कॅनडा व श्रीलंका येथील महिला कॅरमपटूंचाही सहभाग अपेक्षित आहे, त्यामुळं स्पर्धेला आंतरराष्ट्रीय स्वरूप लाभणार आहे.

स्पर्धेतील विजेत्या महिला खेळाडूंना रोख बक्षिसांसह चषक आणि प्रमाणपत्रे देण्यात येणार आहेत. याशिवाय, उपांत्य व पूर्वफेरीपर्यंत पोहोचणाऱ्या महिला खेळाडूंनाही रोख बक्षिसे देऊन त्यांचा सन्मान केला जाणार आहे. त्यामुळं नवोदित आणि अनुभवी महिला खेळाडूंना मोठे व्यासपीठ मिळणार आहे. या स्पर्धेसाठी भारतीय आयुर्विमा महामंडळ, इंडियन ऑइल, बँक ऑफ इंडिया, बँक ऑफ महाराष्ट्र, हिंदुस्तान पेट्रोलियम आदी नामांकित संस्थांचे सहकार्य लाभलं आहे. स्पर्धेसाठी आंतरराष्ट्रीय दर्जाचे कॅरम बोर्ड आणि साहित्य वापरण्यात येणार असून, खेळाडूंना उत्तम सुविधा उपलब्ध करून दिल्या जाणार आहेत.

महाराष्ट्र कॅरम असोसिएशनचे अध्यक्ष जितेंद्र शाह आणि कार्याध्यक्ष भारत देसाई यांच्या मार्गदर्शनाखाली ही स्पर्धा यशस्वी करण्यासाठी संपूर्ण कार्यकारिणी प्रयत्नशील आहे. महिला खेळाडूंना अधिक संधी, ओळख आणि आत्मविश्वास मिळावा, हा या स्पर्धेचा मुख्य उद्देश असल्याचं आयोजकांनी स्पष्ट केलं आहे. ही स्पर्धा म्हणजे महिला कॅरमपटूंना राष्ट्रीय आंतरराष्ट्रीय पातळीवर पुढं जाण्यासाठी एक महत्त्वाचं पाऊल ठरणार आहे.

# प्रजासत्ताक दिनी वास्तू कन्सल्टंट आणि इंजिनिअर्सतर्फे भव्य मॅरेथॉन

**रोहा : प्रतिनिधी**

भारतीय प्रजासत्ताक दिनाचे औचित्य साधून 'वास्तू कन्सल्टंट आणि इंजिनिअर्स' यांच्या वतीने आयोजित करण्यात आलेल्या मॅरेथॉनचे हे चौथे वर्ष २६ जानेवारी २०२६ रोजी उत्साहात पार पडले. आरोग्याप्रती जागरूकता निर्माण करण्याच्या उद्देशाने आयोजित या स्पर्धेत लहानांपासून थोरांपर्यंत सर्वांनीच उत्स्फूर्त सहभाग नोंदवला.



पहाटे ५:३० वाजल्यापासूनच धावपटूंच्या आगमनाने वातावरण चैतन्यमय झाले होते. सकाळी ५:३० ते ६:०० या वेळेत वॉर्म अप सत्र झाले, ज्यामध्ये सहभागींनी शरीर सज्ज केले. या स्पर्धा वेगवेगळ्या क्षमतेनुसार तीन गटांमध्ये ही धाव विभागण्यात आली होती. या स्पर्धेला कालभैरव मंदिर वरसे येथून सुरुवात करण्यात आली.

सकाळी ६. ०० वाजता १५ किमी अंतराच्या मुख्य शर्यतीला सुरुवात झाली.सकाळी ६.१५ मिनिटांनी १० किमी गटातील धावपटूंनी प्रस्थान केले. सकाळी ६:३० वाजता ५ किमी गटातील उत्साही नागरिक आणि मुलांनी धाव घेतली.

या मॅरेथॉनचे वैशिष्ट्य म्हणजे यामध्ये वयाची कोणतीही अट नव्हती. एकूण १५० पेक्षा जास्त सहभागींनी यात धाव घेतली. धावीर रन्नर्स आणि रोहा रन्नर्स, सुदर्शन केमिकल्सचे कर्मचारी, वास्तू कन्सल्टन्सीचे कर्मचारी, रोहा परिसरातील स्थानिक रहिवासी यांचा सहभाग होता. सकाळी ८ वाजेपर्यंत सर्व धावपटूंनी आपले उद्दिष्ट पूर्ण केले.

विजेत्यांच्या यादीमध्ये ५ किलोमीटर मध्ये सोमनाथ शिद, करण शिद, आर्यन ढुंगणे, गणराज पाटील. १० किलोमीटरमध्ये देवराम पारधी, केतन शिद, अरिहान यादव. १५ किलोमीटरमध्ये तुषार जाधव, प्रमोद भगत, मंथन सागर ढमाले यांनी पारितोषिक पटकाविले, यानंतर सर्व सहभागींसाठी पौष्टिक नाष्ट्याची सोय करण्यात आली होती. एकमेकांचे अभिनंदन करत आणि पुढच्या वर्षी पुन्हा भेटण्याच्या उत्साहात सर्वांनी निरोप घेतला.

> आरोग्यदायी जीवनशैलीचा संदेश घराघरात पोहचवण्यासाठी आम्ही गेली ४ वर्षे हा उपक्रम राबवत आहोत. यंदाचा प्रतिसाद अतिशय प्रेरणादायी होता.
> **–आयोजक,** वास्तू कन्सल्टंट आणि इंजिनिअर्स

# नरसिंह यादव दंगल लीगचे चॅम्पियनपद महाराष्ट्राकडे

**मुंबई : प्रतिनिधी**

**अ**र्जुन पुरस्कार विजेते व ऑलिम्पियन श्री. नरसिंह यादव (पोलीस उपायुक्त, मुंबई) यांच्या संकल्पनेतून आणि नरसिंह फाउंडेशन तसेच नागरिक संरक्षण दल यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित 'नरसिंह यादव दंगल लीग' स्पर्धेत महाराष्ट्र संघाने विजयी झेंडा फडकावला.



श्री. विलासराव देशमुख मैदान, लोखंडवाला, कांदिवली (पूर्व), मुंबई येथे झालेल्या या एकदिवसीय कुस्ती लीगमध्ये महाराष्ट्र, उत्तर प्रदेश, हरियाणा आणि पंजाब या देशातील चार बलाढ्य कुस्ती राज्यांचे संघ सहभागी झाले होते. प्रत्येक संघातून ५ पुरुष व २ महिला अशा एकूण ७ खेळाडूंनी सहभाग घेतला असून, स्पर्धेत एकूण २८ कुस्तीपटूंनी आपली ताकद आजमावली.

स्पर्धेची सुरुवात हरियाणा व पंजाब यांच्यातील चुरशीच्या सामन्याने झाली. या लढतीत हरियाणाच्या ५ कुस्तीपटूंनी विजय मिळवला, तर पंजाबच्या २ कुस्तीपटूंनी बाजी मारली. परिणामी पहिला सामना हरियाणा संघाने जिंकला.

दुसऱ्या सामन्यात उत्तर प्रदेश आणि महाराष्ट्र यांच्यात रंगतदार सामना झाला. महाराष्ट्राच्या ४ कुस्तीपटूंनी विजय मिळवत संघाला आघाडी मिळवून दिली, तर उत्तर प्रदेशच्या ३ कुस्तीपटूंनी विजय मिळवला. या सामन्यात महाराष्ट्र संघ विजयी ठरला.

अंतिम सामन्यात महाराष्ट्र आणि हरियाणा आमनेसामने आले. महाराष्ट्राच्या पृथ्वीराज पाटील, रविराज चव्हाण, आदर्श पाटील, अमृता पूजारी आणि सोनाली मंडलिक या पाच कुस्तीपटूंनी शानदार विजय मिळवला, तर हरियाणाच्या अंकुश सागर दहिया आणि कुसुम दहिया यांनी आपापले सामने जिंकले. अंतिम फेरीत महाराष्ट्रने ५–२ असा विजय मिळवत 'नरसिंह यादव दंगल लीग'चे चॅम्पियनपद पटकावले.

या स्पर्धेसाठी केंद्रीय सामाजिक न्याय राज्यमंत्री रामदास आठवले, मीरा–भाईंदर पोलीस आयुक्त निकेत कौशिक, आमदार अतुल भातळखर, आमदार संजय उपाध्याय, दुबईतील उद्योगपती काझी अब्दुल मतीन, संपत साळुंखे, माजी खासदार गोपाळ शेट्टी यांची प्रमुख उपस्थिती होती.

स्पर्धेतील विजेत्यांवर लाखो रुपयांच्या बक्षीसांचा वर्षाव करण्यात आला. विजेत्या महाराष्ट्र संघाला आयोजक नरसिंह यादव आणि डॉ. शिल्पी शेरॉन–यादव यांच्या हस्ते चांदीची गदा आणि 'नरसिंह यादव दंगल लीग' ची मानाची ट्रॉफी प्रदान करण्यात आली.

# श्रेयस अय्यरला प्लेइंग ११मध्ये संधी न देण्याचे कारण समोर

**मुंबई : प्रतिनिधी**



ईशान किशन अनफिट असूनही टीम इंडियाने श्रेयस अय्यरला चौथ्या टी२० मध्ये संधी दिली नाही. या निर्णयामुळे अनेक प्रश्न निर्माण झाले आहेत. श्रेयस अय्यरला मैदानात उतरवण्यात येणार नसेल, तर त्याला टी२० संघात का समाविष्ट करण्यात आले आहे, असाही सवाल विचारला जात आहे. प्रसिद्ध समालोचक आकाश चोप्रा म्हणाला की जर श्रेयस अय्यरला संधी दिली जाणार नसेल, तर त्याला एखादा युवा खेळाडू संघात घ्यायला हवा. याचदरम्यान, आता श्रेयस अय्यरला प्लेइंग इलेव्हनमध्ये स्थान न मिळण्याचे एक मोठे कारण समोर येत आहे.

श्रेयस अय्यरला मैदानात उतरवण्याचे सर्वात मोठे कारण म्हणजे त्याची टी२० संघातील अनुपस्थिती. अय्यर टी२० विश्वचषक संघाचा भाग नसल्याने त्याचा विचार केला जात नाहीये. सध्या संघ व्यवस्थापन अशा खेळाडूंना संधी देत आहे, जी टी२० विश्वचषकासाठी आधीच संघात आहेत किंवा स्टँडबाय खेळाडू म्हणून त्यांना संधी आहे. अय्यरचा टी२० विश्वचषकात सहभाग असण्याची शक्यता कमी आहे. कारण तिलक वर्मा पूर्णपणे तंदुरुस्त आहे आणि संघाकडे त्याच्या जागी तिसऱ्या क्रमांकावर आधीच एक खेळाडू आहे.

टीम इंडिया टी२० विश्वचषक संघासाठी निवडलेल्या खेळाडूंना जास्तीत जास्त खेळण्याचा वेळ देऊ इच्छिते. उदाहरणार्थ, विशाखापट्टणम टी२०मध्ये भारतीय संघाने इशान किशनच्या जागी अर्शदीप सिंगला मैदानात उतरवले. संघाने एक फलंदाज कमी केला, परंतु येथे इतर फलंदाजांवर अधिक दबाव आणणे आणि त्यांना खेळण्यासाठी अधिक वेळ देणे हा विचार होता. दुसऱ्या एकदिवसीय सामन्यात भारतीय संघ गोलंदाजीत अपयशी ठरले होते. त्यामुळे असा निर्णय घेतला गेला होता.

# माजी क्रिकेटपटू इरफाण पठाणकडून वर्ल्डकप 'टॉप ४' संघांबाबत भाकित

**मुंबई : प्रतिनिधी**

आयसीसी टी–२० वर्ल्डकप स्पर्धेचा थरार सुरू व्हायला अवघे काही दिवस शिल्लक राहिले आहेत. स्पर्धेतील पहिला सामना ७ फेब्रुवारीला खेळवला जाणार आहे. या स्पर्धेचे आयोजन संयुक्तरित्या भारत आणि श्रीलंकेत केले जाणार आहे. दरम्यान, भारताचा माजी क्रिकेटपटू इरफान पठाणने कोणते चार संघ या स्पर्धेतील सेमीफायनलमध्ये प्रवेश करणार याबाबत भविष्यवाणी केली आहे.



भारताचा माजी क्रिकेटपटू इरफाण पठाण सध्या समालोचकाच्या भूमिकेत आहे. स्टार स्पोर्ट्सवरील एका कार्यक्रमात बोलताना त्याने भारत, पाकिस्तान, ऑस्ट्रेलिया आणि इंग्लंड हे चार संघ टी–२० वर्ल्डकप स्पर्धेतील सेमीफायनलमध्ये प्रवेश करू शकतात, असे सांगितले

भारतीय संघाने २००७मध्ये झालेल्या टी–२० वर्ल्डकप स्पर्धेत जेतेपदाचा मान पटकावला होता. त्यानंतर भारतीय संघाला दुसरे जेतेपद मिळवण्यासाठी १७ वर्ष वाट पाहावी लागली. अखेर रोहित शर्माच्या नेतृत्वाखाली खेळताना भारतीय संघाने जेतेपदाचा मान मिळवला. रोहितने टी–२० वर्ल्डकप जिंकल्यानंतर टी–२० आंतरराष्ट्रीय क्रिकेटमधून निवृत्तीची घोषणा केली होती. ही जबाबदारी सूर्यकुमार यादवकडे सोपवण्यात आली होती. कर्णधार म्हणून सूर्यकुमार यादवचा रेकॉर्डही दमदार राहिला आहे. त्यामुळे भारतीय संघाला जेतेपदासाठी प्रबळ दावेदार मानले जात आहे.

आयसीसी स्पर्धांमध्ये ऑस्ट्रेलियाचा बोलबाला पाहायला मिळत असतो, तर इंग्लंडनेदेखील टी–२० आंतरराष्ट्रीय क्रिकेटमध्ये दमदार कामगिरी केली आहे.

# नोव्हाक जोकोविचला सेमी फायनलची लॉटरी!

**सिडनी : वृत्तसंस्था**

ऑस्ट्रेलियन ओपनच्या उपांत्य पूर्व फेरीत इटलीच्या लॉरेन्झो मुसेटीविरुद्ध वॉकओव्हरचा ट्विस्टमुळे सर्बियन टेनिसपटू नोव्हाक जोकोविचला उपांत्य फेरीची लॉटरी लागल्याचे पहायला मिळाले. मुसेटीने या लढतीतील पहिले दोन सेट जिंकले होते. एवढेच नाहीतर तिसऱ्या सेटमध्येही तो जोकोविचला पराभूत करण्याच्या मार्गावर होता. पण दुखापतीमुळे त्याने सामन्यातून माघार घेतली अन् जोकोविचला पुढच्या फेरीत प्रवेश करण्याची संधी मिळाली.



वर्षातील पहिल्या वहिल्या ग्रँडस्लॅम स्पर्धेतील उपांत्य पूर्व लढतीत पराभवाच्या छायेत असताना मिळालेल्या विजयासह जोकोविचने ऑस्ट्रेलियन ओपनमध्ये सर्वाधिक सामने जिंकण्याचा रॉजर फेडररचा विक्रमही मोडला आहे. जोकोविचने मेलबर्नमधील या ग्रँडस्लॅम स्पर्धेत एकूण १०३ सामने जिंकले आहेत, तर फेडररने आपल्या कारकिर्दीत १०२ सामने जिंकल्याचा रेकॉर्ड आहे. पाचव्या मानांकित मुसेटीला तिसऱ्या सेटच्या पहिल्याच सर्व्हिस गेममध्ये ग्रोइनला दुखापत झाली आणि तो धावू शकत नव्हता. त्याने सामना सोडण्याचा निर्णय घेतला आणि जोकोविचला अनपेक्षित विजय मिळाला.

जोकोविचने मुसेटीबद्दल सहानुभूती व्यक्त केली आणि मान्य केले की, तो इटालियन खेळाडूविरुद्ध सामना गमावण्याच्या स्थितीत होता. मुसेटीच हा सामना जिंकायला हवा होता, असेही त्याने स्पष्ट केले. सामन्यानंतर जोकोविच म्हणाला, त्याच्याबद्दल मला वाईट वाटतं, एवढंच मी सांगू शकतो. तो खूपच चांगला खेळत होता. मी आज घरी जाण्याच्या मार्गावर होतो. ग्रँडस्लॅमच्या उपांत्यपूर्व फेरीत दोन सेट्सची आघाडी आणि पूर्ण नियंत्रण असताना जे घडलं ते खूप दुर्दैवी आहे. आज तोच विजेता असायला हवा होता यात शंका नाही.

### सिनरविरुद्ध सेमीफायनल रंगणार

टेनिस जगातील दुसऱ्या क्रमांकाचा टेनिसपटू यानिक सिनर आणि नोवाक जोकोविच यांच्यात ऑस्ट्रेलियन ओपनचा सेमीफायनल सामना रंगणार आहे. मेलबर्नमध्ये सलग तिसऱ्यांदा फायनलमध्ये प्रवेश मिळवण्यासाठी या दोघांमध्ये लढत पाहायला मिळले. गतविजेता सिनरने सरळ सेटमध्ये विजय नोंदवत सेमीफायनलमध्ये धडक मारली आहे. दुसरीकडे विक्रमी १० वेळचा ऑस्ट्रेलियन ओपन विजेता जोकोविच नशिबाच्या जोरावर अंतिम चारमध्ये पोहचण्यात यशस्वी ठरला आहे.

# न्यूझीलंडचा ५० धावांनी विजय

**विशाखापट्टणम : वृत्तसंस्था**

विशाखापट्टणम येथे झालेल्या चौथ्या टी–२० सामन्यात न्यूझीलंडने भारतावर ५० धावांनी विजय मिळवला. २१६ धावांच्या लक्ष्याचा पाठलाग करताना भारताची सुरुवात खराब झाली. अभिषेक शर्मा शून्यावर तर कर्णधार सूर्यकुमार यादव ८ धावांवर बाद झाला. केवळ १५ चेंडूंत अर्धशतक झळकावून भारताच्या आशा जिवंत ठेवल्या होत्या. हे टी–२० क्रिकेटमधील कोणत्याही भारतीयाचे तिसरे सर्वात वेगवान अर्धशतक ठरले. त्याने एकूण ६५ धावा (२३ चेंडू) केल्या, मात्र हर्षित राणाच्या शॉटवर गोलंदाजाचा हात लागून चेंडू स्टंपला लागल्याने तो दुर्दैवीरीत्या धावबाद झाला.



या सामन्यात भारताने नाणेफेक जिंकून न्यूझीलंडला प्रथम फलंदाजीसाठी बोलावले होते. न्यूझीलंडकडून डेवॉन कॉनवे आणि टीम सिफर्ट यांनी दणक्यात सुरुवात केली होती. दोघांनी आक्रमक खेळ केला. त्यांनी जवळपास १२ च्या धावगतीने धावा करताना १०० धावांची भागीदारीही केली. अखेर त्यांची धोकादायक ठरणारी भागीदारी ९ व्या षटकात कुलदीप यादवने तोडली. त्याने कॉनवेला रिंकू सिंगच्या हातून बाद केले. कॉनवेने २३ चेंडूंत ४ चौकार आणि ३ षटकारांसह ४४ धावांची खेळी केली. त्यानंतर पुढच्याच षटकात रचिन रवींद्र देखील २ धावांवर बाद झाला. तरी नंतर ग्लेन फिलिप्सने सिफर्टची साथ दिली. सिफर्टने अर्धशतकही पूर्ण केले. पण १३ व्या षटकात सिफर्टचा अडथळा अर्शदीप सिंगने दूर केला. त्याने रिंकू सिंगच्या हातून त्याला बाद केले. सिफर्टने ३६ चेंडूंत ७ चौकार आणि ३ षटकारांसह ६२ धावा केल्या. त्यानंतर मात्र न्यूझीलंडने नियमित अंतराने विकेट्स गमावल्या.

आक्रमक खेळणाऱ्या फिलिप्सला १४ व्या षटकात कुलदीप यादवने बाद केले. तो १६ चेंडूंत २४ धावा करून रिंकू सिंगच्या हातून झेलबाद झाला. १६ व्या षटकात मार्क चॅपमनही ९ धावांवर रवी बिश्नोईच्या गोलंदाजीवर बाद झाला. झकारी फोक्सने आक्रमक सुरुवात केली. पण तोही १८ व्या षटकात १३ धावांवर बाद झाला. पण शेवटच्या दोन षटकांत डॅरिल मिशेलने आक्रमक खेळ केला आणि संघाला २० षटकात ७ बाद २१५ धावांपर्यंत पोहचवले. मिशेलने १८ चेंडूंत २ चौकार आणि ३ षटकारांसह नाबाद ३९ धावा केल्या. मॅट हेन्रीने नाबाद ६ धावा केल्या. भारताकडून अर्शदीप सिंग आणि कुलदीप यादव यांनी प्रत्येकी २ विकेट्स घेतल्या. जसप्रीत बुमराह आणि रवी बिश्नोई यांनी प्रत्येकी १ विकेट्स घेतली.

# खेळाडूंना मिळणाऱ्या वागणुकीवर इगा स्विएटेकचे खळबळजक विधान

**नवी दिल्ली : वृत्तसंस्था**

ऑस्ट्रेलियन ओपन टेनिस स्पर्धेत मंगळवारी कोको गॉफने उपस्थित केलेलाच मुद्दा इगा स्विएटेकने बुधवारी उपस्थित केला. क्वार्टरफायनलमध्ये पराभव झाल्यानंतर कोर्टच्या बाहेर एका निर्जन भागात निराशेने रॅकेट फोडणाऱ्या २१ वर्षीय अमेरिकन खेळाडूचा व्हिडिओ व्हायरल झाल्यानंतर तिने नाराजी व्यक्त केली.



लॉकर रूमपासून कोर्टपर्यंत आणि त्यादरम्यान जवळजवळ सर्वत्र खेळाडूंवर लक्ष ठेवणाऱ्या अमर्यादित प्रवेश कॅमेऱ्यांचा वापर करण्याचा विचार तिला करण्याची गरज असल्याचे गॉफ म्हणाली. बुधवारी क्वार्टरफायनलमध्ये पाचव्या मानांकित एलेना रायबाकिनाकडून ७–५, ६–१ असा पराभव झाल्यानंतर, स्विएटेकला विचारण्यात आले की खेळाडूंना कॅमेऱ्यापासून लपण्यासाठी जागा नसल्याबद्दल तिला कसे वाटते.

इतर स्पर्धांमध्येही खेळाडूंच्या हालचालींवर कॅमेरा मॉनिटरिंग केले जाते आणि ऑस्ट्रेलियन ओपनही त्याला अपवाद नाही. स्टेडियमच्या खाजगी भागातील काही फुटेज नेहमीच प्रसारित केले जात नाहीत, परंतु खेळाडूंना हे आठवण करून देण्याची गरज नाही की कॅमेऱ्यात कैद केलेले काही क्षण व्हायरल होऊ शकतात कारण ते गोंडस, माहितीपूर्ण किंवा अगदी नाट्यमय असतात.

जागतिक क्रमवारीत दुसऱ्या क्रमांकावर असलेल्या स्विएटेकने सांगितले की तिच्या खेळाचे काही पैलू आहेत जे तिला सामन्यासाठी कोर्टवर जाण्यापूर्वी सराव करायचे आहेत आणि कॅमेऱ्याच्या नजरेत न येता ती असे करू शकेल अशी जागा असणे चांगले होईल. २४ वर्षीय पोलिश खेळाडू म्हणाली, आम्ही टेनिस खेळाडू आहोत. ६६ ते आमचे काम आहे. तुमची मान्यता विसरून मीम बनणे हे आमचे काम नाही.

प्रश्न असा आहे की, आम्ही टेनिस खेळाडू आहोत की आम्ही प्राणीसंग्रहालयातील प्राण्यांसारखे आहोत, जिथे आम्ही शौचास जातो तेव्हाही आमच्यावर लक्ष ठेवले जाते, तुम्हाला माहिती आहे का? शेवटच्या संदर्भाबद्दल माफी मागत मी म्हणालो, ठीक आहे, ते स्पष्टपणे अतिशयोक्ती होती, पण थोडी गोपनीयता असणे चांगले होईल, आणि स्वतःच्या प्रक्रिया असणे आणि सतत कोणाच्या देखरेखीखाली न राहणे देखील चांगले होईल. मी माझे ओळखपत्र विसरल्यानंतर सुरक्षा रक्षकांनी मला थांबवले, ज्याचा एक व्हिडिओ व्हायरल झाला. मी एक दिग्गज महिला टेनिसपटू असूनही, चार फ्रेंच ओपन, तसेच विम्बल्डन आणि यूएस ओपन जिंकले आहे, हे घडले. पण सुरक्षा ही सुरक्षा असते, असेही स्वीटेक इगा हिने सांगितले.

दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या जाहिरातीतील सेवा, उत्पादने अथवा त्यासंदर्भातील कोणत्याही दाव्यांची वा उपयोगाची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहर घेणार नाही. दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींची खातरजमा व शहानिशा वाचकांनीच करून संबंधितांशी व्यवहार करावेत. त्यासंदर्भात प्रसिद्ध झालेल्या दाव्यांच्या पूर्ततेची, तसेच कोणत्याही मजकुराची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहरचे मुद्रक, प्रकाशक, संपादक वा मुख्य संपादक यांच्यावर राहणार नाही, याची दैनिक राम प्रहरच्या वाचकांनी आणि जाहिरातदारांनी नोंद घ्यावी. **–मुख्य संपादक**

हे पत्र मालक मल्हार नेटवर्क प्रा. लि. करिता मुद्रक, प्रकाशक कृष्णा चांगू ठाकूर यांनी सिद्धकला प्रिंट मीडिया अॅण्ड पब्लिकेशन्स प्रा. लि., डब्ल्यू २३० टीटीसी इंडस्ट्रियल एरिया, एमआयडीसी, ठाणे–बेलापूर रोड, कोपरखैरणे, नवी मुंबई ४०० ७१० येथे छापून अस्पायर प्राईड, गाळा नं. ४, रुपाली चौक, पनवेल. ४१० २०६. रायगड येथून प्रकाशित केले. RNI Regn. No. MAH MAR/2008/26534, **मुख्य संपादक : देवदास मटाले.** पोस्टल परवाना क्र. एनएमबी/१२०/२०२०–२२. कार्यालय संपर्क : दूरध्वनी ०२२–२७४८०१००, २७४९०१०० e-mail : ramprahar@gmail.com